पाक्षिक
# मनोगत
प्रदेश बीजेपी

**४९ लाख शेतकऱ्यांच्या खात्यात २३९८ कोटींचे अनुदान जमा**

मुंबई । वर्ष: 6 । अंक: 19 । 1 ऑक्टोबर, 2024 । पृष्ठसंख्या: 36 । किंमत: 5 रू.

# महायुती जिंकणारच!





# अध्यक्षीय मनोगत

# पुन्हा महायुतीच...

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी अलिकडेच महाराष्ट्राचा दौरा करून कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांशी संवाद साधला. या सर्व कार्यक्रमांमध्ये अमितभाईंनी राज्यात महायुतीच सत्तेवर येणार असल्याचे आत्मविश्वासपूर्वक सांगितले. अमितभाईंचा हा दौरा आपल्या संघटनेत चैतन्य निर्माण करणारा ठरला. अमितभाईंच्या मार्गदर्शनामुळे आपल्या कार्यकर्त्यांना नवी ऊर्जा मिळाली. या मेळाव्यांमध्ये अमितभाईंनी कार्यकर्त्यांना निवडणुकीत कोणत्या पद्धतीने काम करायचे आहे, याविषयी मोलाचे मार्गदर्शन केले. अमितभाईंचे मार्गदर्शन या अंकात सविस्तर स्वरूपात देण्यात आले आहे. प्रत्येक बूथवर आपल्या मतांमध्ये किमान १० टक्के वाढ करण्यासाठी कार्यकर्त्यांनी आतापासूनच प्रयत्नाला लागावे, असे अमितभाईंनी स्पष्टपणे सांगितले. आपला पक्ष सर्वसामान्य कार्यकर्त्यांच्या बळावर राजकारणात टिकून आहे. सर्वसामान्य कार्यकर्ता पक्षाकडून कोणत्याच पदाची, सन्मानाची अपेक्षा न करता निवडणुकीत काम करत असतो. याखेरीज पक्ष संघटनेकडून जनसंपर्कासाठी, पक्षाचा सामाजिक पाया विस्तारण्यासाठी देण्यात येणाऱ्या सर्व कार्यक्रमांमध्ये उत्साहाने भाग घेणारा बूथपातळीवरचा कार्यकर्ता हे आपल्या पक्षाचे शक्तीस्थान आहे. अन्य पक्षाचे कार्यकर्ते आणि आपल्या पक्षाचे कार्यकर्ते यामध्ये मूलभूत फरक आहे. आपला कार्यकर्ता राष्ट्रवादाच्या विचारधारेसाठी पक्ष संघटनेसाठी आपले आयुष्य समर्पित करतो. १९५१ मध्ये जनसंघाची स्थापना झाली. जनसंघाने स्थापनेपासूनच प्रखर राष्ट्रवादी विचारधारा मांडण्यास प्रारंभ केला. या विचारधारेसाठी जनसंघाने उभारलेल्या अनेक आंदोलनांमध्ये शेकडो कार्यकर्त्यांना आपले प्राण गमवावे लागले. भारतीय जनता पार्टीनेही सामान्य जनतेच्या प्रश्नांसाठी अनेक आंदोलने केली. यातूनच आपला पक्ष हळूहळू राष्ट्रव्यापी पक्ष बनला. लोकसभा निवडणुकीत महाराष्ट्रात आपल्याला अपेक्षेप्रमाणे यश मिळाले नाही, याला अनेक घटक जबाबदार आहेत. या घटकांचा पक्ष नेतृत्वाने आढावा घेतला आहे. राज्यातल्या महायुती सरकारने गेल्या तीन-चार महिन्यात अनेक चांगले निर्णय घेऊन सर्वसामान्य जनतेला दिलासा दिला आहे. कापूस व सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना घोषित करण्यात आलेल्या अनुदानाचे वितरण सुरू झाले आहे. केंद्र सरकारने कांद्यावरील निर्यात बंदी हटवली आहे. त्याचबरोबर कांद्यावरील निर्यात शुल्कही लक्षणीय प्रमाणात कमी केले आहे. लोकसभा निवडणुकीवेळी विरोधकांनी आरक्षण संपणार, संविधान बदलणार यासारख्या अनेक अफवा पसरवून सर्वसामान्य जनतेच्या मनात संभ्रम निर्माण केला. विधानसभा निवडणुकीत खोट्या-नाट्या प्रचाराचे हे हत्यार उपयोगी ठरणार नाही, हे महाविकास आघाडीच्या नेत्यांच्या लक्षात येऊ लागले आहे. अमितभाईंनी मार्गदर्शन केल्याप्रमाणे कार्यकर्त्यांनी घरोघरी जाऊन महाविकास आघाडीच्या खोट्या प्रचाराचा बुरखा फाडायला हवा. आपल्या पक्षाच्या उमेदवारांबरोबरच महायुतीतील सर्व घटक पक्षांच्या उमेदवारांच्या विजयासाठी सर्वांनी निर्धाराने मैदानात उतरण्याची गरज आहे. मोदी सरकारच्या आणि राज्य सरकारच्या कामगिरीविषयी या अंकात माहिती देण्यात आली आहे. त्या माहितीचा कार्यकर्त्यांनी मतदारांशी संवाद साधताना उपयोग करून घेतला पाहिजे.

**चंद्रशेखर बावनकुळे**

# अंतरंग





०४ जिंकणारच!




०८ सर्वसमावेशक आरोग्य सेवेसाठी आयुष्मान भारत!




१२ शासकतेतील सर्जनशीलता!



१५ एक देश एक निवडणूक



१७ रेल्वे अपघातांद्वारे अराजकता माजवण्याचे षड्यंत्र




१९ मोदी सरकारचे १०० दिवसांतील महत्वपूर्ण निर्णय






संपादक : गणेश हाके

सल्लागार : माधव भांडारी

आ. अतुल भातखळकर

@manogatbjp

सर्व भाजपा हितचिंतक, कार्यकर्ते आणि वाचकांना
विनंती आहे की आपण आपल्या प्रतिक्रिया,
bjpmaha.manogat@gmail.com
editor.bjpmanogat@gmail.com
येथे पाठवाव्यात.

**संपादकीय सल्लागार**

चंद्रहास मिरासदार

सजावट व मांडणी : गौतम आर्य

सहाय्यक : प्रेरणा तळेकर-वीर

**विभागीय समन्वयक**

मराठवाडा (छत्रपती संभाजीनगर) : श्रीनिवास कुलकर्णी

विदर्भ: दीपक माई, त्रिकाल अडसड, प्रवीण गमे

पश्चिम महाराष्ट्र: संजय मयेकर

उत्तर महाराष्ट्र: गोविंद बोरसे

हे पाक्षिक भारतीय जनता पार्टीसाठी प्रकाशक, मुद्रक, मुकुंद कुलकर्णी यांनी विवेक मुद्रणालय, ५, कामत इंडस्ट्रीयल इस्टेट, ३९६, वीर सावरकर मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४००० २५ येथे छापून भारतीय जनता पार्टी, प्रदेश कार्यालय, जीवन बीमा मार्ग, वसंतराव भागवत चौक, सी.डी.ओ. बॅरेक नं.१, मुंबई -२० येथे प्रकाशित केले. संपर्क : ०२२-२२०२२०५०




# जिंकणारच!

● **अमित शाह**, केंद्रीय गृहमंत्री

राज्य विधानसभेची निवडणूक जिंकून महाराष्ट्रात पुन्हा आपले सरकार येणार, असा विश्वास केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी नागपूर येथे झालेल्या कार्यकर्ता संवाद बैठकीत बोलताना व्यक्त केला. श्री. शाह यांनी २४ सप्टेंबर रोजी नागपूर आणि छत्रपती संभाजीराजे नगर आणि २५ सप्टेंबर रोजी नाशिक येथे कार्यकर्ता संवाद बैठकीद्वारे पक्ष कार्यकर्त्यांशी आणि पदाधिकाऱ्यांशी मनमोकळा संवाद साधला. नागपूर येथे बैठकीला भाजपा विधानसभा प्रभारी आणि केंद्रीय मंत्री भूपेंद्र यादव, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री शिवप्रकाश, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, राज्य निवडणूक व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष व ज्येष्ठ नेते रावसाहेब पाटील-दानवे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, वन व सांस्कृतिक मंत्री सुधीर मुनगंटीवार, छत्रपती संभाजीराजे नगर येथील बैठकीला राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे, राष्ट्रीय सचिव पंकजा मुंडे, विजया रहाटकर, गृहनिर्माण मंत्री अतुल सावे, खा.डॉ.भागवत कराड, खा.अशोक चव्हाण आदी उपस्थित होते. या बैठकांमध्ये श्री. शाह यांनी केलेल्या मार्गदर्शनाचा संक्षिप्त अंश.



**लोकसभा** निवडणुकीत आपल्या अपेक्षेप्रमाणे निकाल लागले नाहीत. त्यामुळे कार्यकर्त्यांच्या मनात काहीशी नाराजीची भावना आहे. आपली कामगिरी का चांगली झाली नाही, याची कारणे कार्यकर्त्यांनी जाणून घेणे आवश्यक आहे. ही नाराजी झटकून आपल्याला विधानसभा निवडणुकीच्या तयारीला लागले पाहिजे. निराशा झटकून कार्यकर्ते, पदाधिकाऱ्यांनी कामाला लागावे. लोकसभा निवडणुकीत भाजपा सरकार आरक्षण संपवणार, संविधान बदलणार अशा आशयाच्या खोट्या बातम्या पसरवल्या गेल्या. त्यामुळेच आपली कामगिरी अपेक्षेप्रमाणे झालेली नाही. लोकसभा निवडणुकीवेळचे वातावरण आता राहिलेले नाही. तरीही आरक्षणाबद्दलची वस्तूस्थिती कार्यकर्त्यांनी तळागाळात जाऊन जनतेला समजावून सांगितली पाहिजे.

एखादी खोटी गोष्ट सातत्याने सांगितली गेली तर काही काळाने ती खरी वाटू लागते. त्यामुळेच लोकसभा निवडणुकीत विरोधकांच्या अपप्रचाराचा आपल्याला फटका बसला. आता आपण सामन्य जनतेपर्यंत जावून पोहचलो तर विरोधकांच्या खोट्या प्रचाराचा जनतेवर परिणाम होणार नाही. विदर्भात महायुतीला ४०-४२ जागा मिळाव्यात यादृष्टीने आपल्या नेत्यांचे प्रयत्न चालू आहेत. मात्र राज्यात सत्ता मिळवायची असेल तर विदर्भात किमान ४५ जागा जिंकण्याचे लक्ष्य आपण साध्य केले पाहिजे. राज्यातील सत्तेचा मार्ग विदर्भातून जातो, हे आपण सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे.

अन्य राजकीय पक्षांमध्ये आणि भारतीय जनता पार्टीमध्ये मूलभूत फरक आहे. आपला पक्ष कार्यकर्त्यांच्या बळावर निवडणूक लढवतो. बूथपातळीपर्यंत आपली संघटना काम करत असते. निवडणुकीमध्ये अन्य पक्ष सभा, रोड-शो करतात. मात्र आपण कार्यकर्त्यांशी संवाद साधतो. भारतीय जनता पार्टीने आजपर्यंतच्या निवडणुकांमध्ये जे काही यश मिळवले आहे, ते कार्यकर्त्यांच्या बळावरच मिळवले आहे.

भारतीय जनता पार्टीचा कार्यकर्ता स्वत:चा स्वार्थ साधण्यासाठी पक्षाचे काम करत नसतो. यावेळच्या विधानसभा निवडणुकीतही बूथ पातळीवरच्या भक्कम संघटनेच्या आधारे भारतीय जनता पार्टी राज्यात पुन्हा सरकार बनवेल. भारतीय जनता पार्टीच्या कार्यकर्त्यांसाठी देशहित सर्वात महत्वाचे आहे. सांस्कृतिक राष्ट्रवादाच्या जोरावर भारताला सामर्थ्यवान, सुरक्षित, समृद्ध बनवण्यासाठी भाजपा कार्यकर्ते झटत असतात. अन्य पक्षांपेक्षा भाजपा हा म्हणूनच वेगळा पक्ष ठरतो.

काँग्रेस नेते राहुल गांधी यांनी अलीकडेच अमेरिकेत




जाऊन आरक्षण संपवण्याची भाषा केली आहे. काँग्रेसचा संविधान आणि दलित विरोधी चेहरा यातून दिसला आहे, मात्र भारतीय जनता पार्टी राहुल गांधींचे आरक्षण संपवण्याचे प्रयत्न कदापि यशस्वी होऊ देणार नाही. राज्यातील सर्व सहकारी संस्थांच्या सभासद शेतकऱ्यांना भेटून मोदी सरकारने शेतकऱ्यांच्या विकासासाठी घेतलेल्या निर्णयांची माहिती कार्यकर्त्यांनी द्यावी. शेतकऱ्यांसाठी मोदी सरकारने आणि महाराष्ट्रातील महायुती सरकारने अनेक चांगली कामे केली आहेत. या कामांमुळे सामान्य शेतकऱ्याच्या जीवनात मोठे परिवर्तन घडून येणार आहे. आपण या सर्व गोष्टी शेतकऱ्यांपर्यंत पोहचवल्या पाहिजेत.

२०२४ च्या निवडणुकीच्या निकालाचे तथ्य आपण सर्वांनी समजून घेतले पाहिजे. शाळा-महाविद्यालयातील एखादा विद्यार्थी अंतिम परीक्षेत ९० टक्के गुण मिळवण्याचे लक्ष्य ठेवतो, त्याप्रमाणे अभ्यासाची तयारी करतो. निकाल जाहीर होतो, त्यावेळी त्याला ९० टक्के गुण मिळण्याऐवजी ८० टक्के गुण मिळतात. मात्र ज्या विद्यार्थ्याला २० टक्के गुण मिळण्याची अपेक्षा असते त्या विद्यार्थ्याला ३० टक्के गुण मिळतात. लोकसभा निवडणुकीचा निकाल आपल्या दृष्टीने या दोन विद्यार्थ्यांना मिळालेल्या गुणांप्रमाणे आहे.

१९६२ नंतर कोणत्याच पक्षाला सलग तीन वेळा सरकार बनवण्याची संधी मतदारांनी दिलेली नव्हती. आपल्याला ती संधी मिळाली आहे. १९८४ च्या निवडणुकीत आपल्याला फक्त दोन जागा मिळाल्या होत्या. त्याही स्थितीतून आपण जोमाने उभे राहिलो, हे कार्यकर्त्यांनी लक्षात ठेवावे. फक्त दोन जागा मिळाल्या त्यावेळीही आपण भारतमातेचा जय-जयकार करतच होतो. सांस्कृतिक राष्ट्रवाद हीच आपली त्यावेळीही विचारधारा होती, आजही आपली तीच विचारधारा आहे. ज्या विचारधारेसाठी जनसंघापासून आपण संघर्ष केला ती विचारधारा प्रत्यक्षात आणण्यासाठी सत्तेत आल्यावर प्रयत्न केले. सत्ता आल्यावर विचारधारा विसरण्याची आपली वृत्ती नाही.

**विधानसभा निवडणुकीत विजय मिळवण्यासाठी आपल्याला प्रत्येक बूथवर किमान १० टक्के अधिक मते मिळवावी लागतील. त्यासाठी कार्यकर्त्यांना कसून प्रयत्न करावे लागणार आहेत. २०-३० मते प्रत्येक बूथवर वाढून फायदा होणार नाही. निर्विवाद विजय मिळण्यासाठी आपल्याला प्रत्येक बूथवर १० टक्के अधिक मते मिळवण्याचे उद्दिष्ट गाठावे लागणार आहे.**

आपल्या पक्षाची मते वाढवण्याबरोबरच कार्यकर्त्यांनी मित्र पक्षांच्या उमेदवारासाठीही जिद्दीने काम करणे आवश्यक आहे. उमेदवार कोण आहे, कोणत्या पक्षाचा आहे, हे विचार बाजूला ठेऊन महायुती देईल तो आपला उमेदवार, असे समजून आपल्याला काम करायचे आहे. काँग्रेस-उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना रोखणे हेच आपले उद्दिष्ट आहे. आपसातील मतभेद विसरून जाऊन आपण सर्वांनी कामाला लागले पाहिजे. आपल्या दृष्टीने ही निवडणूक अत्यंत महत्वाची आहे. त्यामुळे अन्य सर्व गोष्टी







विसरून जाऊन या निवडणुकीच्या युद्धात आपल्याला उतरायचे आहे.

**विजयादशमी ते धनत्रयोदशी या काळात प्रत्येक बूथवर ११ मोटरसायकलवरून किमान एक तासाचा फेरफटकाम मारायला हवा.**

मतदारसंघातील धार्मिक, अध्यात्मिक क्षेत्रातील प्रसिद्ध व्यक्तींची भेट घेऊन त्यांचे आशीर्वाद घ्या. पक्षाची सदस्यता नोंदणी मोहीम सुरू झाली आहे. या मोहिमेत सहभागी व्हा आणि सरकारी योजनांच्या लाभार्थ्यांना पक्षाशी कसे जोडता येईल, याचा विचार करा. सरपंच निवडणुकीत पराभूत झालेल्यांना पक्षात आणण्याचा प्रयत्न करा. बूथ, मंडल आणि प्रदेश पातळीवर कार्यकर्त्यांना व्हाटसप ग्रुपद्वारे एकत्र आणा. तेथे पक्ष कमकुवत वाटतो आहे तेथे शक्तीकेंद्र स्थापना करा. महाविकास आघाडीच्या बूथपातळीवरच्या कार्यकर्त्यांना भाजपाशी कसे जोडता येईल, याचा विचार करा. केंद्र, राज्य सरकार आणि भाजपाबद्दलचे महाविकास आघाडी कार्यकर्त्यांच्या मनात असलेले गैरसमज दूर करण्याचे प्रयत्न करा. बचत गट, स्वयंसहाय्यता गट प्रतिनिधींशी संपर्क ठेवा. त्यांना केंद्र व राज्य सरकारच्या योजनांची माहिती द्या.

**पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी संघटनेच्या स्तरावरील गटबाजी संपून टाकली पाहिजे. नेत्यांना आपल्या घरी मनधरणी करण्यासाठी येण्याची गरज पडणार नाही, अशा पद्धतीने काम करा. आपल्या पक्षात अपेक्षा न ठेवणाऱ्या कार्यकर्त्याला पद, अन्य जबाबदाऱ्या दिल्या जातात. पद, सरकारमधील जबाबदाऱ्या द्या, असे म्हणणाऱ्यांना पक्ष काहीच देत नाही.**

लोकसभा निवडणुकीत अनेक समाजघटकांमध्ये नकारात्मकता होती. ही नकारात्मकता आता बराच प्रमाणात कमी झाली आहे. विधानसभा निवडणुकीत महिला मतदारांवर लक्ष केंद्रीत करा. राज्याची निवडणूक देशाच्या राजकारणावर प्रभाव टाकणारी असल्याने एक-एक जागा जिंकण्यासाठी शर्थीचे प्रयत्न करा. प्रत्येक कार्यकर्त्याने किमान ३ कुटुंबांचे मतदान करून घेतले तर आपले यश निश्चित आहे. बाहेरून पक्षात आलेल्यांना यावेळी पक्षाकडून काहीही दिले जाणार नाही. ■

# सर्वसमावेशक आरोग्य सेवेसाठी आयुष्मान भारत!




● **जगत प्रकाश नड्डा**, राष्ट्रीय अध्यक्ष, केंद्रीय आरोग्य मंत्री

> 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने'ला सहा वर्षे पूर्ण झाली आहेत. या योजनेअंतर्गत आरोग्यसेवांच्या सर्वांगीण विकासासाठी कोणती पावले उचलण्यात आली, त्याचा सामान्य नागरिकांना काय फायदा झाला आणि योजनेची या पुढील वाटचाल कशी असेल, याविषयी...

**जगातील** सर्वांत मोठ्या आरोग्यसेवा उपक्रमांपैकी एक ठरलेल्या 'आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजने'ला (B- PMJ) सहा वर्षे पूर्ण झाली आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या दूरदर्शी नेतृत्वाखाली सप्टेंबर २०१८ मध्ये ही कल्याणकारी योजना सुरू करण्यात आली. सर्व नागरिकांना विशेषत: सर्वाधिक दुर्बल घटकांतील व्यक्तींना समन्यायी आरोग्यसेवा उपलब्ध व्हावी, हे या योजनेचे उद्दिष्ट होते. गेल्या सहा वर्षांतील या योजनेच्या अंमलबजावणीतून सरकारची वचनबद्धता प्रतिबिंबित झाली आहे. या महत्त्वाकांक्षी योजनेने लाखो नागरिकांमध्ये आरोग्यपूर्ण आयुष्याविषयी आशा निर्माण केली. रुग्णांना दिलासा दिला. उत्तम दर्जाचे उपचार देऊन अनेकांना मृत्यूच्या दाढेतून बाहेर काढले. देशातील नागरिकांचे कल्याण करणे आणि त्यांच्या आरोग्याचा दर्जा सुधारणे हे सामायिक उद्दिष्ट घेऊन एक राष्ट्र एकत्र आल्यावर काय साध्य केले जाऊ शकते, याचे उत्तम उदाहरण म्हणजे आयुष्मान भारत योजना आहे.

आयुष्मान भारत योजनेचे मुख्य ध्येय साधेसोपे पण क्रांतिकारी आहे. ते म्हणजे, कोणाही भारतीयाला त्याच्या आर्थिक स्थितीमुळे आरोग्यसेवा नाकारली जाऊ नये. द्वितीय आणि तृतीय स्तरांवरील रुग्णालयांत उपचार उपलब्ध व्हावेत यासाठी आयुष्मान भारत योजनेतून प्रति कुटुंब पाच लाख रुपयांपर्यंतच्या वार्षिक सुरक्षा कवचासह

आर्थिकदृष्ट्या वंचित कुटुंबांना देशातील काही सर्वोत्तम रुग्णालयांमध्ये गुणवत्तापूर्ण वैद्यकीय सेवा मोफत मिळविण्याची सुविधा उपलब्ध करून दिली आहे.

### आरोग्यखर्चाच्या ओझ्यातून सुटका

वयोवृद्धांना निवृत्तीनंतरच्या आर्थिक ओढगस्तीच्या आणि आरोग्य खालावत जाण्याच्या काळात उत्तम उपचार उपलब्ध व्हावेत म्हणून या योजनेद्वारे प्रयत्न करण्यात आले आहेत. आयुष्मान भारत योजनेचा लाभ ७० वर्षे आणि त्याहून अधिक वयाच्या, कोणत्याही सामाजिक-आर्थिक स्थितीतील सर्व ज्येष्ठ नागरिकांना उपलब्ध करून देण्याचा निर्णय भारत सरकारने अलीकडेच घेतला आहे. हा निर्णय देशातील बदलती लोकसंख्याशास्त्रीय परिस्थिती विचारात घेऊन उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. त्यापूर्वी आपल्या सामुदायिक आरोग्य कर्मचाऱ्यांची कुटुंबे-मान्यताप्राप्त सामाजिक आरोग्य कार्यकर्त्या (आशा), अंगणवाडी सेविका आणि अंगणवाडी मदतनीस यांना योजनेच्या कवचाखाली आणण्यात आले होते. आजमितीस या योजनेंतर्गत ५५ कोटींहून अधिक लोक आरोग्य सेवांसाठी पात्र आहेत आणि सात कोटी ५० लाखांहून अधिक रुग्णांना उपचारांसाठी एक लाख कोटी रुपयांची मदत यशस्वीरीत्या पुरविण्यात आली आहे. ही एक उल्लेखनीय कामगिरी आहे.

एकेकाळी प्रचंड आरोग्य खर्चामुळे गरिबीत ढकलल्या जाणाऱ्या कुटुंबांना आता अशा संकटांपासून संरक्षण देणारी आर्थिक ढाल उपलब्ध झाली आहे. वैद्याकीय उपचारांसाठी प्रचंड खर्चाचा सामना करणाऱ्या कुटुंबांसाठी ही योजना जीवनदायी ठरली आहे. या योजनेने आर्थिक संकटाच्या दरीत लोटले जाण्यापासून कसे वाचवले, हे सांगणारी शेतकऱ्यांपासून रोजंदारीवर काम करणाऱ्या मजुरांपर्यंत अनेक लाभार्थ्यांची प्रशंसापत्रे आहेत. या अर्थाने आयुष्मान भारतने आपले वचन खरोखर पूर्ण केले आहे. ही योजना व्यापक असून बायपास, सांधे बदलणे यांसारख्या जटिल शस्त्रक्रियांपासून ते कर्करोग आणि मूत्रपिंडाच्या व्याधींवरील उपचारांपर्यंत १९०० हून अधिक वैद्याकीय प्रक्रियांचा समावेश यात आहे. हे उपचार पूर्वी अनेकांना आवाक्याबाहेरचे वाटत मात्र आयुष्मान भारत योजनेने ते सर्वांसाठी सुलभरीत्या आणि किफायतशीर दरांत उपलब्ध करून दिले आहेत.

### मजबूत जाळे, पारदर्शी व्यवहार

आयुष्मान भारतचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे या योजनेत आरोग्यसेवा प्रदात्यांचे मजबूत जाळे निर्माण करण्याची क्षमता, हे आहे. आज, १३ हजारांहून अधिक खासगी रुग्णालयांसह संपूर्ण भारतातील २९ हजारांहून अधिक रुग्णालये या योजनेअंतर्गत समाविष्ट आहेत. हे जाळे ग्रामीण आणि शहरी भागांत सारख्याच प्रमाणात विस्तारलेले असून देशाच्या अतिदुर्गम भागांत राहणाऱ्यांनाही दर्जेदार आरोग्य सेवा मिळेल याची काळजी ते घेते. या योजनेच्या अद्वितीय अशा पोर्टेबिलिटी वैशिष्ट्यामुळे लाभार्थ्यांना ते ज्या राज्याचे रहिवासी आहेत, त्याव्यतिरिक्त इतर देशांत इतरत्र असलेल्या रुग्णालयांमध्ये उपचार घेता येणे शक्य होणार आहे.

योजनेअंतर्गत सर्व कारभार वेगाने आणि पारदर्शीपणे व्हावा यासाठी अत्यंत व्यापक स्वरूपाच्या या जाळ्याला माहिती तंत्रज्ञानविषयक पायाभूत सेवासुविधांची जोड देण्यात आली आहे. त्याद्वारे पारदर्शकता, परिणामकारकता आणि दाव्यांच्या तडजोडीची जलद कारवाई सुनिश्चित करण्यात आली आहे. आधार कार्डवर आधारित बायोमेट्रिक पडताळणी आणि कागदरहित दावे यांच्यामुळे अशा प्रकारच्या मोठ्या प्रमाणावर राबवल्या जाणाऱ्या सार्वजनिक हिताच्या योजनांमध्ये बरेचदा होणारे भ्रष्टाचारासारखे गैरप्रकार आणि अकार्यक्षमता यांच्यात लक्षणीय घट झाली आहे. आयुष्मान भारत योजनेच्या यशाने आरोग्यसेवा परिसंस्थेतील इतर भागांमध्येही सुधारणा घडवून आणल्या आहेत. गुणवत्तापूर्ण आरोग्यसेवा हे या योजनेचे गुणवैशिष्ट्य असल्याने या योजनेने सार्वजनिक आणि खासगी रुग्णालयांना आपल्या पायाभूत सुविधा आणि सेवा अधिक उत्तम दर्जाच्या करण्यास प्रवृत्त केले आहे. याव्यतिरिक्त या योजनेने निकोप स्पर्धात्मक वातावरणाला चालना दिल्याने रुग्णालयांना अधिक उत्तम रुग्णसेवा प्रदान करण्यासाठीदेखील प्रोत्साहित केले आहे.

### प्रतिबंधात्मक उपाययोजनांवर भर

आयुष्मान भारत ही केवळ रुग्णालयातील सेवेशी निगडित योजना नाही. या योजनेसमवेत केंद्र सरकार आयुष्मान आरोग्य मंदिरांची स्थापना करून प्राथमिक आरोग्यविषयक सेवा अधिक बळकट करण्यासाठी कार्य करत आहे. एकंदर लोकसंख्येवर आजारांचा पडणारा भार




कमी करण्याच्या उद्देशाने ही योजना प्रतिबंधात्मक आणि प्रोत्साहनात्मक आरोग्यसेवांवर लक्ष केंद्रित करेल. आतापर्यंत, भारतभर एक लाख ७३ हजारांहून अधिक आयुष्मान आरोग्य मंदिरांची स्थापना करण्यात आली असून यामध्ये सामान्य आजारांसह मधुमेह, उच्च रक्तदाब आणि कर्करोग यांसारख्या दीर्घकालीन आजारांसंदर्भात रुग्णांची मोफत तपासणी आणि निदान केले जाते आणि औषधे दिली जातात. ही केंद्रे, एक सर्वसमावेशक आणि सर्वांगीण आरोग्यसेवा प्रारूपाची रचना करण्याच्या दिशेने सुरू असलेल्या आपल्या वाटचालीच्या केंद्रस्थानी आहेत. याअंतर्गत निरामयता आणि वेळीच निदान या गोष्टींना प्रोत्साहन देऊन रुग्णालयात दाखल होण्याची आवश्यकता कमी केली जाईल आणि आरोग्यसेवा अधिक शाश्वत होत जाईल, असा ठाम विश्वास आहे.

आयुष्मान भारत योजनेची यशोगाथा साजरी करत असताना एकीकडे आपल्यासमोर असलेली आव्हानेदेखील आपण स्वीकारली पाहिजेत. या योजनेचा आवाका अतिशय प्रचंड असून त्यामुळेच त्यात सातत्याने बदल घडवून आणून ती अधिक उत्तम करून त्यात सुधारणा करण्याची जबाबदारीदेखील आपसूकच येते. या योजनेची व्याप्ती वाढवण्याच्या उद्देशाने आम्ही सातत्याने काम करत आहोत, रुग्णालयांना त्यांचे पैसे वेळेवर अदा केले जातात आणि प्रत्येक लाभार्थ्याला मिळणाऱ्या सेवेची गुणवत्ता वाढविली जात आहे.

पुढे मार्गक्रमण करताना, आम्ही आयुष्मान भारत योजना अधिक बळकट करू आणि एका समग्र, परवडण्याजोग्या आणि गुणवत्तापूर्ण दर्जेदार आरोग्यसेवेकडे सुरू असलेल्या भारताच्या प्रवासात ही योजना कायमच आघाडीवर राहील, असा विश्वास वाटतो. या योजनेअंतर्गत दिल्या जाणाऱ्या उपचारांची संख्या आणि पॅनेलमधील रुग्णालयांची संख्या आणखी वाढवण्यासाठी तसेच आयुष्मान आरोग्य मंदिरांच्या यशस्वी कामगिरीच्या पलीकडे अधिक यशस्वी वाटचाल करण्यासाठी आम्ही वचनबद्ध आहोत.

राष्ट्राचे आरोग्य हा त्याच्या समृद्धीचा पाया असतो, असा केंद्रीय आरोग्यमंत्री या नात्याने माझा दृढ विश्वास आहे. देशाची निरोगी जनता ही त्या देशाची वृद्धी, उत्पादकता आणि नावीन्यपूर्ण कल्पना यामध्ये योगदान देण्यासाठी अधिक सक्षम असते. आरोग्यपूर्ण, मजबूत आणि विकसित भारताच्या या दूरदृष्टीमध्ये आयुष्मान भारत केंद्रस्थानी आहे. या योजनेला आतापर्यंत मिळालेल्या यशातून कठोर परिश्रम, समर्पण तसेच केंद्र सरकार, आरोग्यसेवा प्रदाते आणि नागरिकांमधील समन्वय प्रतिबिंबित होतो. आम्ही प्रत्येक नागरिकाच्या कल्याणासाठी आणि त्याला आरोग्यपूर्ण आयुष्य प्रदान करण्यासाठी वचनबद्ध आहोत.

आयुष्मान भारत प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेच्या या सहाव्या वर्धापन दिनानिमित्त, आपण सर्वसमावेशक, सुलभ आणि सर्वांची काळजी घेणारी अशी आरोग्यसेवा व्यवस्था निर्माण करण्याच्या आपल्या समर्पणाला अधिक बळकटी देऊ या. भावी पिढ्यांसाठी एकत्रितपणे निरोगी भारताची निर्मिती करण्यासाठी पावले टाकूया. ■

# आयुष्मान भारत योजनेसाठी ज्येष्ठांनी असा करावा अर्ज

**केंद्र** सरकारने ७० वर्षांवरील सर्व ज्येष्ठ नागरिकांना आयुष्मान भारत योजनेचा लाभ मिळणार आहे. या योजनेंतर्गत ५ लाख रुपयांपर्यंत मोफत उपचार मिळणार आहेत. आयुष्मान भारत पंतप्रधान जन आरोग्य योजना असे या योजनेचे नाव आहे. ही योजना सध्या सरकारने जाहीर केली असून, महिनाभरात ती लागू करण्यात वेण्याची शक्यता आहे. या योजनेसाठी ज्येष्ठ नागरिकांनी कसा अर्ज करावा, जाणून घेऊ या...




### ७० व त्यावरील सर्व वयाचे ज्येष्ठ नागरिक या योजनेसाठी पात्र

६ कोटी ज्येष्ठ नागरिकांना फायदा होणार आहे. या योजनेंतर्गत आधीच समाविष्ट असलेल्या कुटुंबांना त्यांच्या कुटुंबातील ज्येष्ठांसाठी पाच लाख रुपयांचे टॉप अप म्हणजेच अतिरिक्त कव्हरेज मिळणार आहे. हे इतर कुटुंबीयांसोबत शेअर होणार नाही. पाच लाख रुपयांपर्यंत प्रति वर्ष/प्रति कुटुंब मोफत आरोग्य विमा मिळेल. पात्र असलेल्या नागरिकांनी आधार कार्ड किंवा रेशन कार्डद्वारे केवायसी करून आयुष्मान भारत योजनेचे कार्ड तयार करणे आवश्यक आहे.

### कोणकोणते खर्च योजनेत समाविष्ट आहेत?

योजना तपासणी, उपचार, सल्ला, रुग्णालयात दाखल होण्यापूर्वीचा खर्च, औषधी, लॅब तपासणी, शस्त्रक्रिया, रुग्णालयात दाखल झाल्यानंतर १५ दिवसांपर्यंतचा देखभालीचा खर्च समाविष्ट आहे.

### अर्ज कसा करावा?

- आयुष्मान भारत योजनेच्या pmjay.gov.in या अधिकृत वेबसाइटवर जावे.
- मोबाइल क्रमांक नोंदवावा. ओटीपीद्वारे पडताळणी करावी.
- पात्रतेच्या पडताळणीसाठी आधार कार्ड किंवा रेशन कार्डची माहिती द्यावी.
- या ठिकाणी लाभार्थ्यांच्या वयाची पडताळणी केली जाते.
- ७० पेक्षा जास्त वय असल्यास नोंदणीची प्रक्रिया पार पाडता येते. इतर निकष लागू होत नाहीत.
- पडताळणीनंतर कौटुंबिक ओळखीसाठी पुरावे जोडावे.
- त्यानंतर स्वतंत्र आयुष्मान भारत योजनेच्या आयडी असलेले ई-कार्ड छापून घ्यावे.
- पती-पत्नी दोघेही ७० पेक्षा जास्त वयाचे असल्यास दोघांना मिळून ५ लाखांपर्यंतचे उपचार मोफत होतील. कारण ही कौटुंबिक विमा योजना आहे.
- या योजनेत संपूर्ण भारतातील सुमारे ३०,००० पॅनल रुग्णालयांमध्ये उपचारांचा समावेश आहे. ■

# शासकतेतील सर्जनशीलता!



दिव्यांग वर्गासाठी केंद्र सरकारने सार्वजनिक ठिकाणी सर्व सुविधा पुरवण्याचा निर्णय घेतला. दिव्यांगांना दैनंदिन जीवनात आवश्यक असणारी उपकरणे, यंत्रे पुरवण्यासाठीही मोदी सरकारने धोरणात्मक निर्णय घेतले.

● **विनय सहस्रबुद्धे**

> विरोधकांनाही मान्य व्हाव्यात अशा कल्पना सूत्रबद्ध स्वरूपात मांडणे आणि त्यांच्या अंमलबजावणीचाही नेमका विचार करणे ही ७५ व्या वर्षांत पदार्पण करीत असलेल्या विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या वैचारिक योगदानाची वैशिष्ट्ये ठरतात..

**धरणे** आणि मुख्यत्वे शेतीसाठी पाणीपुरवठा करणारे कालवे आपल्या देशात पूर्वापार आहेतच. पण पाणी वाहून नेणाऱ्या या कालव्यांवर सौरऊर्जा निर्मितीचे पत्रे आच्छादून एकीकडे पाण्याचे बाष्पीभवन रोखायचे आणि दुसरीकडे सौरऊर्जाही निर्माण करायची ही कल्पना सुचून ती सर्वप्रथम अमलातही आणली गेली ती मात्र नरेंद्र मोदी मुख्यमंत्री असताना त्यांच्याकडून, अर्थातच गुजरातेत!

७५ व्या वर्षांत पदार्पण करीत असलेल्या विद्यमान पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या खात्यावर अशा अनेक नव-कल्पनांच्या सर्जनाचे श्रेय जमा आहे. मुलींची शाळांमधील गळती थांबावी यासाठी कन्या-शाळा-प्रवेश हाच एक उत्सव म्हणून साजरा करून प्रवेशाच्या प्रसंगाला प्रतिष्ठेशी जोडायचे या कल्पनेतून त्यांनी गुजरातेत अमलात आणलेला 'शाळा-प्रवेशोत्सव' असो किंवा गावात आलेल्या पाटाचे पाणी प्रत्येक शेताला मिळाले पाहिजे ही जबाबदारी गावांतल्या महिलांवर सोपविण्याची यशस्वी योजना असो, अथवा फॉरेन्सिक सायन्स म्हणजेच न्याय-वैद्यक क्षेत्रातील भारतातले पहिले विद्यापीठ स्थापन करण्यातले पुढाकार असो; नरेंद्र मोदी यांनी शासकता म्हणजे गव्हर्नन्सच्या क्षेत्रात आणलेली अभिनव दृष्टी आणि त्यामागचा त्यांचा विचार-व्यूह अनेक कारणांनी उल्लेखनीय ठरतो हे मोदींच्या विरोधकांनाही मान्य व्हायला हरकत नसावी! गेल्या दहा वर्षांत मोदींनी केंद्रातील सरकार चालवताना दिलेल्या घोषणा, त्यांची अर्थवाही सूत्र-वाक्ये आणि त्या मागची त्यांची वैशिष्ट्यपूर्ण धोरण-दृष्टी यांचा आढावा घेताना हे सर्व सहजच लक्षात येते.

पंतप्रधान म्हणून नरेंद्र मोदींनी आणलेल्या काही योजना, प्रकल्प आणि महत्त्वाच्या घोषणा यांमागे त्यांची लोकांना काही उदात्त आणि भव्य-दिव्य विचार करण्यासाठी प्रेरित करण्याची धडपड जशी आहे तशीच काही अतिशय व्यावहारिक सूत्रेदेखील आहेत. आणि या दोन्ही प्रकारांत

व्यापून आहे तो त्यांचा लोकशिक्षण, प्रबोधन घडवून आणण्याचा दृष्टिकोन.

केंद्रात सत्तेवर येण्यापूर्वीपासूनच त्यांनी 'सु–शासन आणि विकास' या द्वि–सूत्रीवर वारंवार भर दिला. देशवासीयांची विकासाची, आपले जीवनमान उंचावण्याची भूक त्यांना समजत होती आणि म्हणूनच, म्हटले तर साधेच पण 'जीवनाच्या गुणवत्तेशी शासकतेचा आणि विकासाच्या अर्थकारणाचा सख्खा संबंध असतो' या वास्तवाचा स्वीकार करणारे हे सूत्र प्रचलित करून त्यांनी आपल्या वेगळेपणाची चुणूक दाखविली. 'सबका साथ, सबका विकास' ही त्यांची मूळ आणि सुरुवातीची घोषणा. पुढे २०१९ मध्ये त्यांनी यामध्ये सबका विश्वास हे सूत्र जोडले आणि तीन एक वर्षांपूर्वी कोणत्याही विकासासाठी 'सबका प्रयास'ही खूप आवश्यक असतो हे देशवासीयांच्या मनावर बिंबवले. कोणताही देश व समाज विकासाचे 'आउटसोर्सिंग' करू शकत नाही आणि त्यामुळेच विकास हा केवळ सरकारी कार्यक्रम असणे पुरेसे नाही. 'विकास ही एक लोक–चळवळ व्हायला हवी' हे पंतप्रधान मोदींचे आग्रहाचे मत आहे आणि अनेकदा त्यांनी ते मांडलेही आहे. याच विकासाच्या चर्चेत त्यांनी ऐन करोना–काळात 'आत्मनिर्भर भारत' ही संकल्पना मांडून स्वदेशी लस–उत्पादनाला प्रोत्साहन दिले आणि ते घडवूनही आणले. वैश्वीकरणोतर जागतिक अर्थव्यवस्थेत स्वदेशीची चर्चा मागे पडत असताना गुळगुळीत न झालेली नवी शब्दावली रूढ करून मोदींनी आर्थिक आणि संसाधनांच्या संदर्भात आपण इतरांवर अवलंबून राहण्यातील धोके अप्रत्यक्षरीत्या सर्वांसमोर आणले.

आकांक्षी जिल्हे, त्यासाठी लोककल्याणातील संपृक्तता आणि त्याला स्त्री–नित विकासाची जोड आणि या सगळ्यातून २०४७ पर्यंत विकसित भारत घडवून आणण्याचे भव्य–दिव्य उद्दिष्ट हे मोदींच्या विचार–व्यूहाचे आणखी काही ठळक पण दुर्दैवाने उपेक्षित राहिलेले पैलू! औद्योगिकीकरण, शहरीकरण संरचनात्मक विकास हे सर्व सुरू असतानासुद्धा आजही मूलभूत विकासापासून शेकडो योजने दूरच राहिलेले देशातले काही टापू उपेक्षेच्या अंधाराची बेटे ठरली आहेत. पूर्वीच्या सरकारांनी या टापूंना अति–मागास जिल्हे म्हटले होते. मोदींनी या अति–मागास जिल्ह्यांना आकांक्षी जिल्हे असे मोठे अन्वर्थक आणि सकारात्मक नाव तर दिलेच पण त्यासाठी विशेष निधीची तरतूदही केली. या जिल्ह्यांच्या विकासाला गती मिळण्याच्या मार्गात कोणी झारीतले शुक्राचार्य बनू नये यासाठी खुद्द दिल्लीत त्यांच्या विकास– विषयांचा पाठपुरावा करण्यासाठी प्रत्येक आकांक्षी जिल्ह्याला एकेक पालक अधिकारीही आता दिला गेला आहे. पहिल्या दशकातील यशानंतर आता आकांक्षी जिल्ह्यांवरून ही योजना आकांक्षी विकास–खंडांपर्यंत (ब्लॉक्स) पोहोचवण्यात आली आहे.

केंद्र सरकारच्या सर्व लोक–कल्याणकारी योजना त्या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र असलेल्या सर्व नागरिकांपर्यंत पोहोचाव्यात यासाठी पंतप्रधान–कार्यालयातूनही ज्या एका मुद्द्यावर विशेष भर दिला जातो तो मुद्दा म्हणजे संपृक्ततेचा. प्रत्येक लोक–कल्याणकारी योजना विशिष्ट कालमर्यादेत एका भौगोलिक क्षेत्रात १०० टक्के पात्र नागरिकांपर्यंत पोहोचून त्यांना त्याचा लाभ घेता यावा ही खास मोदींची दृष्टी आहे. हे सर्व घडून यायचे तर त्यासाठी वंचितांविषयी संवेदनशील आणि सर्वंकष विचारांची क्षमता असलेले कुशल नेते–प्रशासक हवेत. पुरुषांपेक्षा स्त्रियांकडे ही गुणसंपदा असण्याची शक्यता अधिक. नेमके हेच ओळखून मोदींनी स्त्री–नित विकास म्हणजेच 'महिलांच्या नेतृत्वाखाली विकास' ही संकल्पना चर्चेत आणली, याचीही नोंद घ्यायला हवी. देशात आजवर महिला सक्षमीकरणाच्या अनुषंगाने बरीच चर्चा घडून आली आहे परंतु स्त्री–नित विकास ही संकल्पना सक्षमीकरणाच्या चर्चेला खूप पुढे घेऊन जाणारी आणि म्हणूनच उल्लेखनीय ठरते.

शब्दावलींमधले अर्थवाही बदल विचार–पद्धतीतही बदल घडवून आणतात. त्या दृष्टीने पंतप्रधान मोदींमुळे दृढ झालेला 'दिव्यांग' हा शब्दही महत्त्वाचा आहे. पूर्वी ज्यांना अपंग म्हणजे डिसएबल्ड म्हटले जायचे त्यांना इंग्रजीत आता स्पेशली एबल्ड म्हटले जाते. बहुसंख्य अपंगांकडे त्यांच्यातील न्यूनतेवर मात करणारे एखादे विशेष कौशल्य हमखास आढळते. म्हणूनच त्यांच्या व्यक्तिमत्त्वातील सकारात्मकतेकडे लक्ष वेधणारी, त्याची नोंद घेणारी शब्द–रचना म्हणजे 'दिव्यांग'! सरकारदरबारी आणि समाजातही आता हा शब्द रूढ झाला आहे पण त्या मागच्या विचार–व्यूहाचे महत्त्व ध्यानात घेतले गेले नाही तर हे धोरण–दृष्टी मधले परिवर्तन केवळ एक शब्दावलीतला बदल असे भासले अथवा भासविले जाऊ शकते आणि तसे अर्थातच होता कामा नये!



रेल्वे स्थानकांसारख्या सार्वजनिक ठिकाणी दिव्यांगांच्या व्हिल चेअरसाठी रँप बसविले गेले आहेत.

लालबहादूर शास्त्रींमुळे 'जय–जवान, जय–किसान' ही घोषणा लोकप्रिय झाली. अटलबिहारी वाजपेयींनी त्याला 'जय विज्ञान'ची जोड दिली आणि मोदींनी आणखी पुढे जाऊन जोडले 'जय अनुसंधान'! यातूनच आता मूलभूत संशोधनाला आणखी गती मिळेल. पण नरेंद्र मोदींकडे ज्या एका अतिशय अर्थवाही घोषणेचे जनकत्व जाते ती घोषणा म्हणजे 'एक भारत–श्रेष्ठ भारत'. भारताचे श्रेष्ठत्व भारताच्या एकत्वावर, एकात्मतेवर निरपवादपणे अवलंबून आहे याची जाणीव करून देणारी ही सहज, सोपी घोषणा. आता याच नावाने केंद्र सरकारच्या सांस्कृतिक मंत्रालयाने एक योजना सुरू केली असून त्यायोगे आपल्या देशातील विविधतेच्या अंतरंगात असलेले सांस्कृतिक एकत्वाचे नानाविध पैलू अनुभव–शिक्षणातून समोर आणले जातात.

घोषणा, सूत्रवाक्ये आणि योजनांच्या पलीकडे नरेंद्र मोदींनी स्वातंत्र्य–दिनाच्या एका भाषणात जनतेसमोर मांडलेले पंच–संकल्प किंवा पंच–प्रण आणि विश्व समुदायाला आवाहन करून 'पर्यावरण स्नेही जीवनशैली'च्या गरजेकडे वेधलेले लक्ष हे मोदींचे पंतप्रधान या नात्याने उल्लेखनीय वैचारिक योगदान आहे हे मोदींचे 'भक्त' नसलेल्यांनासुद्धा मान्य करावे लागेल. त्यांनी मांडलेल्या पंच–संकल्पांमध्ये विकसित भारताचे 'लक्ष्य' ठेवून काम करणे, गुलामीच्या मानसिकतेतून स्वत:ची आणि समाजाची मुक्ती, देश आणि समाज म्हणून आपल्याला मिळालेल्या वारशाचा सार्थ अभिमान, एकता आणि एकजूट बळकट करण्यावर भर आणि नागरिक म्हणून असलेल्या आपल्या कर्तव्यांचे नित्य स्मरण या; पाच अशा मुद्द्यांचा समावेश आहे की कुणा विरोधकांनाही त्याला आक्षेप घेता येऊ नये. हे पाचही संकल्प समजायला सोपे आहेत आणि त्याबद्दल प्रत्येकालाच काही ना काही करता येण्याजोगे आहे.

जी–२० परिषदेच्या सुमारासच मोदींनी लाइफस्टाइल फॉर एनव्हायर्नमेंट (ध्र्राए) या सूत्राचा आन्तरराष्ट्रीय मंचांवर पुरस्कार केला. यातून 'विकसित' राष्ट्रांमधील प्रस्थापित जीवनशैलींमुळे होत असलेले जागतिक पर्यावरणाचे अपरिमित नुकसान, ते रोखण्यासाठी आवश्यक असलेले सर्वंकष जीवनशैली–परिवर्तन, ते न घडून आल्यामुळे ठळकपणे समोर येत असलेली विकसित राष्ट्रांतील समाजांची दांभिकता, असे त्रिविध मुद्दे इतक्या सुस्पष्टतेने आणि लख्खपणे समोर आले की त्याला विरोध करणे कोणालाच शक्य झाले नाही. विकसित राष्ट्रांनी पर्यावरणाची हानी होत असताना लोक–जीवन–शैली पातळीवर काही बदल करण्याकडे साफ दुर्लक्ष करून विकसनशील राष्ट्रांना मात्र ऊठसूट उपदेशाचे डोस पाजावेत या 'अरे'ला; हा मुद्दा चर्चेत आणून भारताने दिलेला हा 'कारे' चा प्रतिसाद होय. पर्यावरणाच्या मुद्द्यांवरही जे जागतिक राजकारण सुरू असते त्यात हे विशेष उल्लेखनीय ठरते.

नरेंद्र मोदी हे तिसऱ्यांदा जनादेश मिळवून पंतप्रधान झालेले आणि त्यापूर्वी गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून उल्लेखनीय यश मिळवलेले नेते आहेत. त्यांच्या राजकारणाला काहींचा विरोध असू शकतो. पण त्यांना सरसकट विरोध करण्याच्या नादात त्यांनी ज्या नव्या संकल्पना मांडल्या, जे अभिनव प्रयोग केले त्याकडे दुर्लक्ष होऊ नये, यासाठीच हा लेखनप्रपंच!

**(लेखक 'रामभाऊ म्हाळगी प्रबोधिनी'चे उपाध्यक्ष, भाजपाच्या सु–शासन विभागाचे प्रमुख आहेत.)**

# एक देश एक निवडणूक



माजी राष्ट्रपती माननीय रामनाथ कोविंद यांच्या नेतृत्वात 'एक राष्ट्र, एक निवडणूक' या विषयावर झालेल्या समितीच्या शिफारसीनुसार आदरणीय पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या यशस्वी नेतृत्वात 'वन नेशन-वन इलेक्शन' या प्रस्तावाला केंद्रीय मंत्रिमंडळाची मंजुरी ऐतिहासिक, स्तुत्य आणि योग्य आहे. आम्ही या प्रक्रियेचे स्वागत करतो.

● भारतीय जनता पार्टी असे मानते की भारतासारख्या विशाल देशासाठी 'एक राष्ट्र, एक निवडणूक' अत्यंत आवश्यक आहे. आम्ही सुरुवातीपासूनच याच्या समर्थक राहिलो आहोत. हे आमच्या जाहीरनाम्याचा देखील भाग राहिले आहे. भाजपने सुरुवातीपासूनच यासाठी प्रयत्न केले आहेत.

● स्वातंत्र्यानंतर १९५२, १९५७, १९६२ आणि १९६७ मध्ये लोकसभा आणि विधानसभेच्या निवडणुका एकत्रच होत होत्या,परंतु नंतर काही विधानसभांचे विसर्जन होणे आणि सरकारे कोसळण्यामुळे ही परंपरा मोडली.

● 'एक राष्ट्र, एक निवडणूक' लागू झाल्याने देशात दरवर्षी होणाऱ्या निवडणुकांवर खर्च होणाऱ्या हजारो-लाखो कोटी रुपयांची बचत होईल आणि प्रशासनाला नवीन गती मिळेल. एकत्रित निवडणूक झाल्याने करदात्यांचा पैसा वाचेल आणि तो जनतेच्या भल्यासाठी वापरला जाऊ शकेल.

● एका अंदाजानुसार, १९५१-५२ च्या लोकसभा निवडणुकीत ११ कोटी रुपये खर्च झाले होते, २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत एकूण ३० हजार कोटी रुपये खर्च झाला होता आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत ६० हजार कोटी रुपयांचा प्रचंड खर्च झाला होता.

● वारंवार निवडणुका झाल्याने शासकीय कामकाजातही अडथळे येतात. वारंवार निवडणुका झाल्यामुळे शिक्षण क्षेत्रातील कामकाजावरही परिणाम होतो. असे शिक्षण क्षेत्रातील होणारे नुकसान देखील टळेल.




● भारतासारख्या विशाल देशात दरवर्षी कुठे ना कुठे निवडणुका होतच असतात. या निवडणुकांमध्ये संपूर्ण राज्य यंत्रणा आणि संसाधनांचा वापर केला जातो.

● शिवाय, वारंवार निवडणुका झाल्याने आदर्श आचारसंहिता लागू करण्यामुळे सरकार वेळेवर कोणतेही धोरणात्मक निर्णय घेऊ शकत नाही आणि विविध योजनांच्या अंमलबजावणीत अडथळे निर्माण होतात. शासनाचे कामकाज ठप्प होते.

● 'एक राष्ट्र, एक निवडणूक' लागू झाल्याने निवडणुकांसाठी वारंवार तयारी करावी लागणार नाही आणि शासनाच्या कामकाजात येणारा हा अडथळा देखील दूर होईल.

● 'एक राष्ट्र, एक निवडणूक' चा एक फायदा म्हणजे भ्रष्टाचार आणि काळा पैसा यावरही बऱ्याच प्रमाणात नियंत्रण ठेवता येईल.

● रोजगाराच्या कारणास्तव कोट्यवधी लोक त्यांच्या घरापासून दूर असतात. अनेकदा विविध परिस्थितीमुळे काही निवडणुकांमध्ये मतदान करता येत नाही. 'एक राष्ट्र, एक निवडणूक'मध्ये दर पाच वर्षांनी एकदाच मतदान करायचे असल्याने, निवडणुकीदरम्यान बाहेर असलेले लोकदेखील मतदानासाठी त्यांच्या मूळ गावात येऊ शकतात. यामुळे मतदानात लोकांचा सहभाग वाढेल.

● निवडणूक ड्युटीवर असणाऱ्या सुरक्षा दलांचे वेळ वाचेल. सध्या प्रत्येक निवडणुकीत त्यांना एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी पाठवण्याचा खर्च आणि तजवीज करावी लागते. निवडणूक प्रचारासाठी नेत्यांचा वेळ वाचेल. हा वेळ देश आणि जनतेच्या भल्यासाठी वापरला जाऊ शकेल. वारंवार निवडणुका झाल्याने होणारा निवडणूक प्रचार, रॅली, सभा, व्हीआयपींच्या आगमनामुळे सामान्य नागरिकांना होणारा त्रास टळेल.

● राजकीय तज्ञ असे मानतात की, संपूर्ण देशात एकत्रित निवडणुका झाल्यामुळे राजकीय स्थिरता येईल. सध्या एखाद्या राज्यात सरकार वेळेपूर्वी कोसळले किंवा तेथे कोणत्याही पक्षाला बहुमत मिळाले नाही तर निवडणूक आयोगाला पुन्हा निवडणुका घ्याव्या लागतात. परंतु एकत्रित निवडणुका झाल्या तर ठराविक काळानंतरच त्या राज्यात निवडणुका होऊ शकतील. यामुळे सामान्य जीवन आणि राज्य यंत्रणा यांना वारंवार अडचणींना सामोरे जावे लागणार नाही.

● सामान्यत: निवडणुकीदरम्यान धर्म आणि जात यासारखे मुद्दे प्रमुखतेने समोर येतात. अशा मुद्द्यांमुळे समाजात ध्रुवीकरण होते. जर वारंवार निवडणुका झाल्या नाहीत, तर असे मुद्देही वारंवार समोर येणार नाहीत आणि यामुळे समाजातील दुरावा कमी होईल.

● १९८३ मध्ये निवडणूक आयोगाने 'एक राष्ट्र, एक निवडणूक' चा विचार मांडला होता आणि असे म्हटले होते की लोकसभा आणि राज्य विधानसभेच्या निवडणुका एकत्रितपणे घेण्यासाठी एक प्रणाली तयार केली पाहिजे.

● ज्येष्ठ न्यायमूर्ती व्ही.एम. रेड्डी यांच्या अध्यक्षतेखालील लॉ कमिशनने १९९९ साली आपल्या अहवालात म्हटले होते, आपण अशा स्थितीत परत जावे, जिथे लोकसभा आणि सर्व विधानसभांच्या निवडणुका एकत्रितपणे घेतल्या जात होत्या.

● २०१५ मध्ये 'लोकसभा आणि राज्य विधानसभांसाठी एकत्रित निवडणुका घेण्याची व्यवहार्यता' या अहवालावर संसदीय स्थायी समितीने आणि २०१८ मध्येही संसदीय स्थायी समितीने या प्रस्तावावर भर दिला होता. ■

# रेल्वे अपघातांद्वारे अराजकता माजवण्याचे षड्यंत्र

> जूनमध्ये मोदी सरकार तिसऱ्यांदा सत्तेत आल्यानंतर गेल्या तीन-सव्वातीन महिन्यातील काही घटना सामान्य भारतीय नागरिकाला अस्वस्थ करणाऱ्या ठरल्या आहेत.



४ जून रोजी लोकसभा निवडणुकीचे निकाल जाहीर होत असतानाच जम्मू-काश्मीरमध्ये वैष्णोदेवी भाविकांच्या बसवर हल्ला, १२ जून रोजी कठुआ येथे झालेला दहशतीवादी हल्ला, १३ जून रोजी दोड्डा येथे काश्मीर रायफळ चेकपोस्टवर झालेला दहशतवादी हल्ला, १४ जून रोजी बद्रीनाथ  भाविक बस दुर्घटना या मागे संशयास्पद समान धागा होता. काश्मीर खोऱ्यात ३७० वे कलम रद्द झाल्यानंतर अतिरेक्यांच्या कारवायांना चांगलाच लगाम बसला आहे. मात्र गेल्या ४-५ महिन्यात जम्मू विभागात पाकिस्तान पुरस्कृत दहशतवाद्यांकडून होणारे हल्ले अचानक वाढले आहेत. काश्मीरप्रमाणेच सुरक्षादलांनी जम्मूमधील अतिरेक्यांच्या हालचालींना पायबंद घालण्यासाठी पुन्हा कंबर कसली आहे. जम्मूमधील अतिरेक्यांच्या कारवायांमध्ये अचानक वाढ होत असताना त्याच सुमारास म्हणजे गेल्या वर्षभरात देशभरात रेल्वे मार्गांवर अडथळे निर्माण करून रेल्वे अपघात घडवून आणण्याचे अनेक प्रकार देशभरात घडले आहेत. ४ जून २०२३ ते १३ सप्टेंबर या काळात रेल्वे मार्गावर विविध प्रकारे अडथळे निर्माण करण्याच्या थोड्या थोडक्या नव्हे तर २४ घटना घडल्या आहेत. ५ जून २०२३ रोजी ओडिशातील भद्रक येथील रेल्वे क्रॉसिंगवर लाकडाच्या मोळ्या आढळून आल्या. २ ऑक्टोबर २०२३ रोजी राजस्थानातील गंगरार, सोन्याना, चित्तोडगढ या ठिकाणी रुळांवर दगड ठेवल्याचे आढळून आले. ४ फेब्रुवारी २०२३ रोजी तामिळनाडूतील तिरुनेलवेली येथे वंदे भारत वर दगडफेकीची घटना घडली. २ जून २०२४ रोजी पश्चिम बंगालमधील मालदा येथे रेल्वे सिग्नलमध्ये बिघाड घडवून आणण्याचा प्रयत्न झाला. १२ जुलै २०२४ रोजी पश्चिम बंगालमधीलच दुबराजपूर येथे रेल्वे डब्यांची नासधूस केल्याची घटना घडली. १६ जुलै २०२४ रोजी उत्तर प्रदेशातील लालगोपालगंज स्थानकाजवळ रेल्वे रुळांवर गॅस सिलेंडर आणि हातोडे ठेवण्यात आल्याचे आढळून आले. १७ ऑगस्ट २०२४ रोजी कानपुरजवळ गोविंदपूर येथे साबरमती एक्स्प्रेसचे २० डबे रुळांवरून घसरले. १८ ऑगस्ट २०२४ रोजी मध्य प्रदेशातील गढाकछपुरा येथे रुळावर १५-२० फुट लांबीचे ५-६ लोखंडी रॉड टाकल्या आढळले. २० ऑगस्ट २०२४ रोजी प्रयागराज स्थानकाजवळ रेल्वे मार्गावर दुचाकी ठेवली होती. याच दिवशी बिहारमध्ये दानापूर रेल्वे स्थानकाच्याहद्दीत रेल्वे सुरक्षादलाच्या दोन जवानांची हत्या करण्यात आली. २२ ऑगस्ट २०२४ रोजी उत्तर प्रदेशातील मिर्जापूर जिल्ह्यात हमीरपूर येथे स्टेशन मास्टरवर जीवघेणा हल्ला चढवण्यात आला. २४ ऑगस्ट २०२४ रोजी राजस्थानातील पाली जिल्ह्यात जवाईबंद आणि विरोलिया स्थानकादरम्यान रेल्वे मार्गावर दगड ठेवण्यात आले होते. २३ ऑगस्ट २०२४ रोजी उत्तर प्रदेशातील फारुखाबाद जिल्ह्यात



कयामगंज-शमसाबाद स्थानकादरम्यान रेल्वे रुळावर लाकडी ओंडके ठेवण्यात आले होते. २८ ऑगस्ट २०२४ रोजी राजस्थानातील बारन जिल्ह्यात रुळावर मोटरसायकलची चॅसी ठेवण्यात आली होती. ३० ऑगस्ट २०२४ रोजी तेलंगणात रंगारेड्डी जिल्ह्यात रुळावर लोखंडी रॉड ठेवलेले आढळले. ९ सप्टेंबर २०२४ रोजी उत्तर प्रदेशात कानपुर जिल्ह्यात रुळावर गॅस सिलेंडर आढळले. उपरोक्त घटना मुद्दाम तारीखवार व अन्य तपशीलानिशी दिल्या आहेत. या सर्व घटनांमागे देशात अशांतता, अस्थैर्य, अराजक पसरविण्याचा स्पष्ट हेतू दिसतो आहे. दिल्लीत ३ वर्षापूर्वी शेतकरी आंदोलनादरम्यान लाल किल्ल्यावर खालिस्तानी ध्वज फडकवणे, सुरक्षादलाच्या कर्मचाऱ्यांच्या अंगावर ट्रॅक्टर घालणे यासारखे प्रकार घडले. अग्निवीर योजनेविरोधात उत्तर भारतात अनेक ठिकाणी हिंसक घटना घडल्या. ४ वर्षापूर्वी दिल्लीत सीएएविरोधी आंदोलक अनेक महिने रस्ता अडवून बसले होते. याच आंदोलकांनी पोलिसांवर गोळीबार केला. पोलिसांनी आपल्यावर गोळीबार करावा, त्यातून हिंसाचार भडकावा असाच हेतू दिल्लीतील शाहीनबाग आंदोलकांचा होता. महाराष्ट्रात बदलापुर येथे दोन बालिकांवर झालेल्या अत्याचाराच्या विरोधात आंदोलन करणाऱ्यांनी अनेक तास रेल्वे वाहतूक बंद पाडली होती. देशात सातत्याने अशांतता धगधगत ठेवण्याच्या हेतूनेच हे सारे नियोजनबद्ध पद्धतीने घडविले जात असावे. प्रवासी आणि मालवाहू रेल्वेला मोठे अपघात व्हावे, असाच हेतू या सर्व घटनांमागे होता.




राजस्थानात क्रमांक नसलेली ट्रॅक्टर ट्रॉली रेल्वे मार्गावर उभी करून ठेवण्यात आली होती. अशा घटनाद्वारे हिंसाचार पेटावा, सरकार बदनाम व्हावे याखेरिज अन्य हेतू असूच शकत नाही. भारताच्या आंतरराष्ट्रीय पातळीवरील वाढती ताकद पाहता भारताचे वर्चस्व अनेक बड्या आंतरराष्ट्रीय शक्तींना खुपते आहे. यातला दुर्दैवाचा भाग एवढाच की या शक्तींना आपल्या देशातील मंडळी साथ देत आहेत. राजकीय किंवा अन्य फायद्यासाठी देशात हिंसाचार, अराजक माजवण्याचे प्रयत्न जागरूक जनतेने उधळून लावले पाहिजेत. ■

# मोदी सरकारचे १०० दिवसांतील महत्वपूर्ण निर्णय

## महाराष्ट्रासाठी तीन नव्या वंदे भारत रेल्वे सुरू

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या तिसऱ्या कार्यकाळाच्या पहिल्या १०० दिवसांत घेतलेले महत्त्वाचे निर्णय आणि कामगिरीची माहिती देण्यासाठी केंद्रीय गृह मंत्री आणि सहकार मंत्री अमित शाह यांनी नवी दिल्लीत पत्रकार परिषदेला संबोधित केले. याप्रसंगी अमित शाह यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली गेल्या १०० दिवसांतील महत्त्वाच्या यशाची माहिती देणारी 'विकसित भारताच्या दिशेने मार्गक्रमण' अशा आशयाचे शीर्षक असलेली विशेष पुस्तिका आणि आठ फ्लायर्सचे प्रकाशन केले. केंद्रीय माहिती आणि प्रसारण, रेल्वे, तसेच इलेक्ट्रॉनिक्स व माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव या कार्यक्रमाला उपस्थित होते.

- महाराष्ट्रासाठी ३ नव्या वंदे भारत पुणे-कोल्हापूर, पुणे हुबळी, नागपूर-सिकंदराबाद सुरु
- पुण्यात शिवाजीनगर-स्वारगेट मेट्रो सुरु, स्वारगेट-कात्रज भूमिगत मेट्रोचे भूमिपूजन
- वाढवण बंदराचे भूमिपूजन, या बंदरामुळे १ लाखांपेक्षा अधिक रोजगार तयार होणार
- मोदी सरकार ३.० च्या कार्यकाळाचे पहिले १०० दिवस 'विकसित भारत'च्या निर्मितीसाठी मजबूत पाया रचणारे आहेत. हे १०० दिवस म्हणजे प्रत्येक घटकाला




सामावून घेऊन विकास आणि गरीब कल्याणाचा अद्‌भूत समन्वय करणारे आहेत.

- या १०० दिवसांची १४ स्तंभांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. या १०० दिवसांत पायाभूत सुविधांच्या विकासासाठी ३ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत. महाराष्ट्रातील वाढवण येथे ७६ हजार कोटी रुपये खर्चून एक मेगा पोर्ट बांधण्यात येणार असून, पहिल्या दिवसापासून या बंदराचा जगातील सर्वोत्कृष्ट १० बंदरांमध्ये समावेश होणार आहे.
- आजवर कधीही रस्त्याने जोडली गेली नाहीत अशी २५ हजार गावे रस्त्याने जोडण्याची सुमारे ४९ हजार कोटी रुपये खर्चाची योजना सुरू करण्यात आली. तर, ५० हजार ६०० कोटी रुपये खर्चून भारतातील प्रमुख मार्गांचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. वाराणसीतील लाल बहादूर शास्त्री आंतरराष्ट्रीय विमानतळ, पश्चिम बंगालमधील बागडोगरा, बिहारमधील बिहता येथील विमानतळांचे अद्यतनीकरण करण्यासह अगाट्टी आणि मिनीकॉयमध्ये नवीन हवाई पट्ट्या बांधून पर्यटनाला

चालना देण्यासाठी काम केले जात आहे, या १०० दिवसात बेंगळुरू मेट्रो फेज-३, पुणे मेट्रो, ठाणे इंटिग्रल रिंग मेट्रो आणि इतर अनेक मेट्रो रेल्वे प्रकल्पांनीही प्रगती केली आहे.

● प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या १७ व्या हप्त्याअंतर्गत ९.५० कोटी शेतकऱ्यांना २०,००० कोटी रुपये वितरित करण्यात आले आहेत.

● मक्यापासून इथेनॉल तयार करण्यासाठी सहकारी साखर कारखान्यांच्या इथेनॉल उत्पादक युनिट्सचे मल्टी-फीड इथेनॉल युनिटमध्ये रूपांतर करण्यात आले आहे. यामुळे आता केवळ उसापासूनच नव्हे तर मक्यापासूनही इथेनॉल तयार करता येणार आहे.

● या १०० दिवसांत मध्यमवर्गीयांना अनेक दिलासा देणारे अनेक निर्णय घेण्यात आले आहेत. कर सवलती अंतर्गत, ७ लाख रुपयांपर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही प्राप्ती कर लागणार नाही, हा त्यापैकी एक निर्णय आहे.

● २०२४ मध्ये आतापर्यंत, प्रधानमंत्री सूर्य घर मोफत वीज योजनेअंतर्गत २.५ लाखांहून अधिक घरांपर्यंत सौरऊर्जा पोहोचली आहे.

● मुद्रा कर्जाची मर्यादा १० लाख रुपयांवरुन वाढवून २० लाख रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे आणि ज्यांनी आपल्या जुन्या कर्जाची यशस्वी परतफेड केली आहे त्यांना याचा फायदा होईल.

● कोणत्याही देशाच्या विकासासाठी सक्षम तरुण ही मूलभूत अट आहे. सरकारने २ लाख कोटी रुपयांचे प्रधानमंत्री पॅकेज जाहीर केले आहे, ज्या अंतर्गत पुढील ५ वर्षात ४ कोटी १० लाख तरुणांना लाभ पोचणार आहे. आमच्या सरकारने शीर्ष कंपन्यांमध्ये एक कोटी तरुणांना अंतर्वासिता संधी, भत्ते आणि एकवेळ मदत देण्याचा निर्णय घेतला आहे. केंद्र सरकारमधील नोकऱ्यांसाठी हजारो नियुक्त्याही जाहीर करण्यात आल्या आहेत.

● भांडवली खर्च ११ लाख ११ हजार कोटी रुपयांपर्यंत वाढवणे हा एक मैलाचा दगड आहे. यामुळे तरुणांसाठी अनेक रोजगाराच्या नवीन संधी निर्माण होतील आणि आपल्या पायाभूत सुविधाही मजबूत होतील.

● दीनदयाल अंत्योदय योजनेअंतर्गत १० कोटींहून अधिक महिलांना संघटित करून ९० लाखांहून अधिक स्वयंसहायता गट स्थापन करण्यात आले असून लखपती दीदी या योजनेअंतर्गत १०० दिवसांत ११ लाख नवीन लखपती दीदींना प्रमाणपत्रे देण्यात आली आहेत.

● प्रधानमंत्री जनजाती उन्नत ग्राम अभियानांतर्गत ६३,००० आदिवासी गावांचा पूर्ण विकास केला जाईल. यामुळे ५ कोटी आदिवासींची आर्थिक स्थिती सुधारेल.

● वक्फ सुधारणा विधेयक-२०२४ हे वक्फ मालमत्तेचे व्यवस्थापन, संरक्षण आणि गैरवापर रोखण्यासाठी कटिबद्ध असून ते येत्या काही दिवसांत संसदेत मांडले जाईल.

● वैद्यकीय महाविद्यालयात ७५ हजार नवीन वैद्यकीय जागा वाढवून आम्ही वैद्यकीय शिक्षणासाठी परदेशावरील अवलंबित्व संपवण्याच्या दिशेने वाटचाल करत आहोत.

● १५० वर्षांहून अधिक जुन्या ब्रिटीशांनी बनवलेल्या कायद्यांऐवजी,भारतीय न्याय संहिता (BNS), भारतीय नागरीक सुरक्षा संहिता (BNSS) आणि भारतीय साक्ष अधिनियम (BS)- हे तीन नवीन कायदे १ जुलै २०२४ पासून लागू करण्यात आले आहेत. ३ वर्षात या कायद्यांची पूर्ण अंमलबजावणी झाल्यानंतर भारताची फौजदारी न्याय प्रणाली जगातील सर्वात आधुनिक होईल.

● केंद्र सरकारच्या 'एनपीएस वात्सल्य' योजनेचा शुभारंभ करण्यात आला. अल्पवयीन मुलांसाठी एनपीएस वात्सल्य योजनेच्या माध्यमातून ही संधी प्राप्त झाली असून या योजनेमुळे मुलांचे भविष्य सुरक्षित होईल, याचा विश्वास वाटतो. एनपीएस वात्सल्य ही ० ते १८ वयोगटातील बालकांसाठी नवीन पेन्शन योजना आहे. पालक आपल्या मुलांच्या नावे या पेन्शन योजनेत महिन्याला किमान १ हजार तर वर्षभरात कमाल अमर्यादीत रुपये जमा करू शकतो. मुलाच्या १८ वर्षापर्यंत हे खाते पालक चालवतील त्यानंतर मुलांच्या नावे हे खाते होणार आहे.

● मुलगा १८ वर्षाचा झाला की, हे खाते अखंडपणे नियमित एनपीएस खात्यात किंवा एनपीएस नसलेल्या योजनेत रुपांतरीत केले जाऊ शकते.

● मोदी सरकार ३.० च्या पहिल्या १०० दिवसांत सुमारे १५ लाख कोटी रुपयांचे प्रकल्प सुरू करण्यात आले आहेत.

● आजवर कधीही रस्त्याने जोडली गेली नाहीत अशी २५ हजार गावे रस्त्याने जोडण्याची सुमारे ४९ हजार कोटी रुपये खर्चाची योजना सुरू करण्यात आली. तर, ५० हजार ६०० कोटी रुपये खर्चून भारतातील प्रमुख मार्गांचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ■

# संकल्पातून सिद्धीकडे...

## मेक इन इंडियाची १० वर्षे




भारतीय बाजारपेठेत चिनी खेळण्यांचे वर्चस्व होते. भारतात अशा पद्धतीची खेळणी स्थानिक उत्पादकांनी बनवावीत, असे आवाहन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केल्यानंतर भारतीय उत्पादकांनी खेळण्यांच्या बाजारपेठेत आपले स्थान अल्पावधित निर्माण केले. आता भारतही खेळण्यांचा निर्यातदार देश बनला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी खेळणी उत्पादकांशी नियमित संवाद ठेवला आहे.

> योजना आणि घोषणा यांना प्रामाणिक भावनांची साथ मिळाली तर काय साध्य होऊ शकते, ते अनुभवण्यासाठी देशाच्या गेल्या दहा वर्षांच्या वाटचालीच्या इतिहासाचा मागोवा घ्यायला हवा. बरोबर दहा वर्षांपूर्वी, सन २०१४ मध्ये २५ सप्टेंबर या दिवशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'मेक इन इंडिया' नावाच्या एका महत्वाकांक्षी कार्यक्रमाची घोषणा केली आणि पुढे चार दिवसांनी, २९ सप्टेंबरला उद्योग क्षेत्राशी संबंधित विविध घटकांसोबत झालेल्या कार्यशाळेतील अनुकूल व उत्साहवर्धक प्रतिसादानंतर केंद्र सरकारच्या विविध खात्यांनी या योजनेच्या अंमलबजावणीसाठी बाह्या सरसावल्या.

**राष्ट्र** निर्माणाच्या पंतप्रधान मोदी यांच्या संकल्पातील हा पहिला संकल्प अमलात आणण्याच्या या प्रक्रियेसमोरची असंख्य आव्हाने ओलांडून या योजनेने आता दहा वर्षे पूर्ण केली आहेत. कोणत्याही राज्यकर्त्यांनी जनतेच्या मनास सुखावणाऱ्या कोणत्या घोषणा केल्या आणि त्या पुढे केवळ कागदावर राहून निव्वळ लोकानुनयाकरिता त्याचा पुनरुच्चार करत कालापव्यय होत राहिला, तर त्यातून काहीच साध्य होत नाही. संकल्प आणि सिद्धी यांमध्ये इच्छाशक्ती नावाचा एक घटक महत्त्वाचा असतो, असे म्हटले जाते. ही इच्छाशक्ती केवळ नियतीची नसते. ज्याने संकल्पाचा उच्चार केलेला असतो, त्याच्या महत्वाकांक्षा उच्च असतील, तर इच्छाशक्तीला आणखी बळ मिळते. याआधी देशातील जनतेने लोकानुनयाच्या वेगवेगळ्या घोषणा अनुभवल्या आणि चहूकडे त्या दुमदुमत असतानाही परिस्थितीत फारसा बदल होत



भारतीय उत्पादकांनी खेळण्यांच्या बाजारपेठेत आपले स्थान अल्पावधित निर्माण केले. आता भारतही खेळण्यांचा निर्यातदार देश बनला आहे.

असल्याचे त्यांना जाणवलेच नाही, हे वास्तव अनेक योजनांबाबत दिसून आले आहे. पंतप्रधानांची ही घोषणादेखील त्याच पठडीतील असेल असेच तेव्हा पूर्वानुभवावरून जनतेस वाटलेदेखील होते. जगाच्या पाठीवर भारताला एक समृद्ध, संपन्न आणि शक्तिशाली राष्ट्र म्हणून उभे करावयाचे असेल, तर प्रत्येक भारतीयाच्या मनात आत्मनिर्भरतेचा आत्मविश्वास रुजविण्याचे हे पहिले आव्हान होते. त्यासाठी सरकारी यंत्रणांची पठडीबाज कार्यपद्धती आणि 'चलता है। मानसिकता बदलण्याची गरज पंतप्रधानांनी लाल किल्ल्यावरील आपल्या पहिल्या भाषणातच अधोरेखित केली, तेव्हाही पूर्वानुभवी जनतेच्या मनात प्रश्नचिन्हेच उमटली होती. वर्षानुवर्षे चालत आलेली कार्यसंस्कृती एका भाषणानंतर बदलेल आणि नव्या आव्हानांना सामोरे जाण्याचा आत्मविश्वास यंत्रणांमध्ये रुजन अल्पावधीत त्याचे परिणामही दिसू लागतील, याविषयी दहा वर्षांपूर्वी मनमनात उमटलेली ती प्रश्नचिन्हे आता पुसली गेली आहेत. मेक इन इंडिया नावाच्या महत्त्वाकांक्षी संकल्पनेने आणि ती वास्तवात आणण्याच्या संकल्पाने आता पूर्ततेच्या वाटचालीतील महत्त्वाचा टप्पा गाठून आव्हाने परतवून लावली आहेत, यात शंका नाही.

सन २०१३ पर्यंत भारताच्या विकासाच्या सकल्पनांचे सारे बुडबुडे फुटले होते आणि विकास दराने सर्वात नीचांकी स्तर गाठला होता. ब्राझील, रशिया, भारत, चीन न आणि दक्षिण आफ्रिका, ज्यांना ब्रिक्स या संक्षिप्त नावाने ओळखले जाते, अशा राष्ट्रांच्या समूहात भारताची आर्थिक स्थिती सर्वाधिक नाजूक म्हणून नोंदविली होती आणि भारताची ही स्थिती म्हणजे संकट, की संधी यावर जागतिक गुंतवणूकदारांच्या वर्तुळात वेगवेगळ्या चर्चा सुरू होत्या. अशा परिस्थितीत मेक इन इंडिया मोहिमेचा झालेला जन्म म्हणजे देशासमोरील एक नवे आव्हानच होते. मोदी यांनी जाहीर केलेल्या या संकल्पाचे बघता बघता राष्ट्रउभारणीच्या चळवळीत रूपांतर झाले आणि पुढे तर, मेक इन इंडिया ही या चळवळीची घोषणा झाली. देशातील व्यापार विश्वासमोरचे आव्हान आणि जगभरातील गुंतवणूकदारांना निमंत्रण, असे या चळवळीचे रूप ठरले.

कोणतीही चळवळ किंवा आंदोलन यशस्वी करावयाचे असेल तर त्यासाठी काही निश्चित रणनीती आखावी लागते. अशी रणनीती ही आंदोलनातील सहभागींची प्रेरणा असते. केंद्र सरकारने त्यासाठी योजनेचे एक आकर्षक पॅकेज तयार केले, त्याचा पुरेपूर बोलबालाही सुरू झाला आणि सरकार व उद्योगविश्व यांनी हातात हात घालून तीन वर्षांकरिता एक योजना आखली. पुढच्या पाच वर्षांत सकल राष्ट्रीय उत्पन्नाचा २५ टक्के हिस्सा या योजनेतून उभा राहिला पाहिजे, असा नवा संकल्प जन्माला आला आणि जगभरातील उद्योगविश्वाचे लक्ष भारताकडे लागले. ही काही स्वदेशी चळवळ नाही. परदेशातील गुंतवणूकदारांनी भारतात उद्योग उभे करावेत, त्यामध्ये भांडवली गुंतवणूक करावी आणि भारतात उत्पादने सुरू करून स्थानिक रोजगाराच्या संधी विस्तृत कराव्यात अशी कल्पना आता पुरेशी साकारली आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत विदेशी गुंतवणूकदारांनी आपल्या उत्पादनांची भारतात निर्मिती सुरू केल्याने उद्योगक्षेत्राला नवी तेजी, नवी ऊर्जा आणि उज्ज्वल भविष्याच्या आशावादाची उभारी मिळाली आहे यात शंका नाही. पुढच्या काही वर्षांत भारताला जगातील तिसरी शक्तिशाली अर्थव्यवस्था म्हणून प्रतिष्ठा प्राप्त करून देण्याचा सरकारचा संकल्प आहे, त्यासमोरही अनेक आव्हाने आहेतच; पण आता त्या संकल्पांना आत्मविश्वासाची साथ मिळाली आहे. गेल्या दहा वर्षांत प्रत्येक तासाला एक याप्रमाणे नवे स्टार्टअप उपक्रम सुरू झाल्याची माहिती अधिकृतपणे जाहीर झाली आहे, तर मेक इन इंडिया चळवळीतून पंधरा लाख रोजगार निर्माण झाले आहेत. जागतिक स्तरावरील एक शक्तिशाली उत्पादनक्षेत्र म्हणून भारताने आपले स्थान अधोरेखित केले ही बाब आता या चळवळीच्या दशकपूर्तीच्या निमित्ताने स्पष्ट झाली आहे. सरकारचा संकल्प आणि जनतेच्या सहभागाचा आत्मविश्वास यांच्या सहयोगाने पठडीबाज 'चलता है'संस्कृतीला हुसकावून लावता येते, याचे यशस्वी उदाहरण म्हणून या चळवळीची नोंद व्हायलाच हवी.

**(दै. पुण्यनगरीचे २८ सप्टेंबर रोजीचे संपादकीय)**

# 'मेक इन इंडिया'ची दशकपूर्ती




या उपक्रमाला घवघवीत यश मिळवून देणाऱ्या तुमच्यापैकी प्रत्येकाला सलाम करण्याचा हा प्रसंग आहे. तुमच्यापैकी प्रत्येकजण एक अग्रणी, दूरदर्शी आणि नवोन्मेषी आहे, ज्यांच्या अथक प्रयत्नांमुळे 'मेक इन इंडिया'च्या यशाला बळ मिळाले आहे आणि परिणामी आपला देश जगाचे लक्ष वेधून घेत आहे आणि कुतूहलाचे केंद्र बनला आहे. हे अथक परिश्रमाचे सामूहिक अभियान आहे, ज्याने एका स्वप्नाचे एका शक्तिशाली चळवळीत रूपांतर केले आहे. - पंतप्रधान नरेंद्र मोदी

**'मेक इन इंडिया'**चा प्रभाव हेच सिद्ध करतो की, भारताला कुणीही थांबवू शकत नाही. आपल्यासारखा प्रतिभावान देश हा केवळ आयातदार नाही तर निर्यातदार म्हणूनही आघाडीवर असावा, यासाठी उत्पादन क्षेत्रात भारताच्या प्रगतीला चालना देण्याच्या महत्त्वाकांक्षी उद्देशाने दहा वर्षांपूर्वी सुरू झालेला हा प्रयत्न होता. या दशकाभराच्या वाटचालीबद्दल बोलताना, माझा ऊर अभिमानाने भरून येतो. १४० कोटी भारतीयांच्या सामर्थ्य आणि कौशल्याने आपल्याला किती दूरचा पल्ला गाठून दिला आहे! 'मेक इन इंडिया'चा ठसा सर्व क्षेत्रांमध्ये दिसू लागला आहे, त्यात अशीही क्षेत्रे आहेत ज्यात आपण प्रभाव पाडण्याचे स्वप्न देखील पाहिले नव्हते.

मोबाइल निर्मिती मोबाइल फोन्स आता किती महत्त्वाचे झाले आहेत हे आपल्याला माहीत आहे, परंतु धक्कादायक बाब म्हणजे २०१४ मध्ये संपूर्ण देशात मोबाइल निर्मिती करणारे केवळ दोन कारखाने होते. आज हा आकडा २०० हून अधिक झाला आहे. आपली मोबाईल निर्यात अवघ्या १५५६ कोटींवरून तब्बल १.२ लाख कोटी रुपयांपर्यंत पोहोचली आहे– ही वाढ ७५०० टक्के इतकी अवाढव्य आहे! आज भारतात वापरले जाणारे ९९ टक्के मोबाइल फोन्स 'मेड इन इंडिया'आहेत. जागतिक स्तरावर आपण दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात मोठे मोबाइल उत्पादक बनलो आहोत.

आपल्या पोलाद उद्योगाकडेच पाहा– आता आपण पूर्णतः प्रक्रिया केलेल्या पोलादाचे निर्यातदार बनलो आहोत, सोबतच २०१४ पासून उत्पादनात ५० टक्क्यांहून अधिक प्रमाणात वाढ झाली आहे. आपल्या सेमीकंडक्टर उत्पादन क्षेत्राने दीड लाख कोटी रुपयांपेक्षा जास्त गुंतवणूक आकर्षित केली असून, दररोज एकत्रितपणे सात कोटी चिप्सचे उत्पादन घेण्याची क्षमता असलेल्या पाच प्रकल्पांनाही मंजुरी देण्यात आली आहे. नवीकरणीय ऊर्जेच्या बाबतीत आपण जागतिक पातळीवर चौथ्या क्रमांकाचे सर्वात मोठे उत्पादक ठरलो आहोत, त्याचवेळी केवळ एका दशकात आपली क्षमता ४०० टक्क्यांनी वाढली आहे. आपले इलेक्ट्रिक वाहन उद्योग क्षेत्र, जे खरे तर २०१४ मध्ये अस्तित्वातच नव्हते, ते आता तीन अब्ज डॉलर्स मूल्याचे झाले आहे. संरक्षण उत्पादनांची निर्यातही १००० कोटी रुपयांवरून वाढून २१००० कोटी रुपयांवर पोहोचली आहे आणि आपण ८५ पेक्षा जास्त देशांमध्ये



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी विविध व्यासपीठांवरून स्थानिक उत्पादने खरेदी करण्याविषयीचे आवाहन (व्होकल फॉर लोकल) केले आहे. पंतप्रधान मोदींच्या या आवाहनाला नागरिकांनी मोठा प्रतिसाद दिला आहे. 'मेक इन इंडिया'ची सांगड 'व्होकल फॉर लोकल'शी घातली गेल्यामुळे स्थानिक भारतीय उत्पादनांची मोठ्या प्रमाणात विक्री होऊ लागली आहे.

निर्यात करू लागलो आहोत. 'मन की बात'च्या या कार्यक्रमाच्या एका भागात मी जोमदार खेळणी उद्योग क्षेत्राची गरज असल्याबद्दल बोललो होतो आणि त्यावर आपल्या नागरिकांनी ही बाब प्रत्यक्षात कशी साकारावी हेच दाखवून दिले! गेल्या काही वर्षांत आपली निर्यात २३९ टक्क्यांनी वाढली असल्याचे आणि त्याचवेळी आयातीत निम्म्याने घट झाली असल्याचे आपण अनुभवले आहे, यामुळे विशेषत: आपल्या स्थानिक उत्पादकांना आणि विक्रेत्यांना लाभ झाला आहे, लहान मुलांना तर निश्चितच झाला आहे!

आपल्या देशाची ओळख बनलेल्या अनेक बाबींपैकी असलेल्या मुख्य बाबी म्हणजे आपली वंदे भारत रेल्वे गाडी, ब्राम्होस क्षेपणास्त्रे आणि आपल्या हातात असलेले मोबाइल फोन. या सगळ्यांवर आता अभिमानाचा मेक इन इंडियाचा शिक्का लागला आहे. इलेक्ट्रॉनिक्सपासून ते अंतराळ क्षेत्रापर्यंतचे हे यश भारतीय कल्पकता आणि गुणवत्तेचे प्रतिनिधित्व करत आहे. मेक इन इंडिया हा उपक्रम विशेष आहे याचे कारण म्हणजे यामुळे गरिबांना मोठी स्वप्ने पाहण्याचे आणि आकांक्षा बाळगण्याचे बळ मिळाले आहे, या उपक्रमाने त्यांना ते साधन संपत्तीचे निर्माते बनू शकतात हा आत्मविश्वास दिला आहे. या उपक्रमाचा सूक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योगक्षेत्रावर पडलेला प्रभावही तितकाच दखल घेण्याजोगा आहे. सरकार म्हणून आम्ही हे चैतन्य अधिक बळकट करण्यासाठी वचनबद्ध आहोत. आमची दशकभरातील कामगिरी पुरेशी बोलकी आहे. उत्पादनसंलग्न प्रोत्साहन- पीएलआय योजना परिवर्तनक्षम ठरल्या आहेत, त्यांनी हजारो कोटींची गुंतवणूक शक्य केली असून लाखो नोकऱ्या निर्माण केल्या आहेत. व्यवसाय करण्यात सुलभता आणण्यात आम्ही लक्षणीय पावले टाकली आहेत. भारताला अनुकूल बरेच काही आज घडते आहे- लोकशाही, लोकसंख्या आणि मागणीचे आम्ही परिपूर्ण मिश्रण आहोत. जागतिक पुरवठा साखळीमध्ये कळीची भूमिका बजावण्यासाठी आवश्यक ते आमच्याकडे आहे, व्यवसायातील विश्वासार्ह भागीदार म्हणून पाहिले जात आहे. अभूतपूर्व युवा शक्ती आमच्याकडे आहे, तिचे यश स्टार्टअप जगतात प्रत्येकाला पाहता येत आहे. एकूणच, गती भारताला अनुकूल आहे. जागतिक महासाथीसारखी अनपेक्षित आव्हाने येऊनही भारताच्या वाढीची वाटचाल सातत्यपूर्ण राहिली आहे. आज, आमच्याकडे जागतिक वाढीचा प्रेरक म्हणून पाहिले जात आहे. मी माझ्या युवा मित्रांना पुढे येण्याचे, मेक इन इंडियात सहभागी होऊन नव्या उंचीवर नेण्याचे आवाहन करतो. सर्वोत्कृष्टतेसाठी आपण सर्वांनीच प्रयत्नांची पराकाष्ठा केली पाहिजे. दर्जेदार पुरवठ्यासाठी आपण वचनबद्ध राहिले पाहिजे. शून्य त्रुटी हा आपला मंत्र असला पाहिजे. एकत्रित होऊन आपण केवळ स्वत:च्या गरजांची पूर्तता करणारा भारतच नव्हे तर जागतिक उत्पादन आणि नवोन्मेषाचे ऊर्जाघर असलेला भारत घडवू शकतो. ■

# ॲण्डर्सन ते पन्नू, मार्गे क्वात्रोची- काँग्रेसचा संशयास्पद प्रवास

> काँग्रेसचे युवराज राहुल गांधी हे अलिकडेच अमेरिका दौऱ्यावर गेले होते. या दौऱ्यात त्यांनी नेहमीप्रमाणे अकलेचे अनेक तारे तोडले. भारतात संविधानिक संस्था सरकारच्या दबावाखाली आहेत, धार्मिक आधारावर भारतात अनेकांचा छळ होतो अशा आशयाची काही विधाने राहुल गांधींनी केली.



**राहुल गांधी यांनी आपल्या अमेरिका दौऱ्यात अमेरिका सिनेट सदस्यांची भेट घेतली. यामध्ये आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर भारता विरोधात भूमिका घेणाऱ्या इल्हान उमर यांचाही समावेश होता. इल्हान उमर या भारताने विरोध करूनही पाकिस्तान व्याप्त काश्मीरच्या वादग्रस्त भागाला भेट देण्यासाठी गेल्या होत्या. तेथे जाऊन त्यांनी भारता विरोधात वक्तव्ये केली. भारतात धार्मिक अल्पसंख्यकांवर अन्याय होत असल्याचा आरोपही उमर यांनी अनेकवेळा केला आहे.**

**भारतातील** राजकीय आणि सामाजिक स्थिती विषयी लोकसभेतील विरोधी पक्ष नेत्याने विदेशात जाऊन मत प्रदर्शन करण्यास काहीच हरकत नाही. मात्र अशी टीका टिप्पणी करताना आपण देशविरोधी शक्तींच्या हातात कोलीत देऊ नये, एवढे भान घटनात्मक पद भूषविणाऱ्या व्यक्तीने ठेवायलाच आहे. सत्तेसाठी उताविळ झालेल्या राहुल गांधींना असा परिपक्वपणा त्यांच्या संपूर्ण राजकीय कारकीर्दीत क्वचितच दाखविता आला आहे. अमेरिकेतील एका कार्यक्रमात बोलताना राहुल गांधी म्हणाले की, भारतात सामान्य नागरिकांना आपले धार्मिक स्वातंत्र्य उपभोगता यावे, यासाठी विविध पातळ्यांवर संघर्ष चालू आहे. सरकार आणि सत्ताधारी पक्षाकडून हिंदू धर्मीय सोडून अन्य सर्व धर्मियांचा छळ केला जात आहे, असे राहुल गांधींना म्हणायचे होते. या अनुषंगाने बोलताना भारतात शीख सुमदायाच्या नागरिकांना पगडी, हातात कडे घालून सार्वजनिक जीवनात वावरता येत नाही, गुरुद्वारामध्ये जाता येत नाही, अशी अत्यंत खोटी, विखारी, टिप्पणी राहुल गांधींनी केली. मोदी सरकार आणि सत्ताधारी भाजपामुळे भारतातील अल्पसंख्याक नागरीक संकटात सापडले आहेत, असे चित्र रंगविण्याचा अश्लाघ्य प्रयत्न राहुल गांधींनी केला. भारतात धर्माच्या आधारावर अल्पसंख्याक नागरिकांवर अननवीत अत्याचार होत आहे आणि आपणच याविरोधात ठामपणे उभे आहोत, असे अमेरिकतील भारतीय नागरिकांच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न राहुलबाबा करत होते. भारतात सर्व धर्मियांच्या नागरिकांना मुक्त धार्मिक स्वातंत्र्य आहे. त्याचबरोबर सर्वसामान्य भारतीयाला राजकीय आणि सामाजिक स्थितीविषयी सरकार व अन्य संबंधितांविरुद्ध मोकळेपणाने टीका करण्याचे स्वातंत्र्य आहे, याचा अनुभव १३० कोटी भारतीय नागरीक घेत आहेत. अनेक काँग्रेस नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर खुलेआम असभ्य भाषेत यथेच्छ शिवीगाळ करत असतात. नरेंद्र मोदी यांना जनरल डायर,

तुघलक, औरंगजेब यासारख्या उपमा देताना काँग्रेस नेत्यांना भारतात सराकरी यंत्रणेकडून अटकाव केला जात नाही. खुद्द राहुल गांधी यांनी राफेल विमान खेरदी प्रकरणात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर भ्रष्टाचाराचे आरोप अनेकदा केले. राफेल विमान खरेदी व्यवहारात कसालाही गैरव्यवहार झाला नाही. त्यामुळे राहुल गांधींनी पंतप्रधान मोदी यांच्यावर आरोप करू नयेत, असे सर्वोच्च न्यायालयाला सांगावे लागले. हा आदेशही राहुलबाबांनी धुडकावला होता. त्याबद्दल त्यांना सर्वोच्च न्यायालयात मुकाटपणे माफीही मागावी लागली.

भारतात शीख सुमदायांच्या नागरिकांना पकडी घालून गुरुद्वारात जाता येत नाही, या राहुल गांधींच्या विधानाला नामचीन खलिस्तानवादी अतिरेकी पन्नू याने तातडीने सहमती दर्शविली. भारतात स्वातंत्र्या मिळाल्यानंतर शीख धर्मियांवर कायमच अत्याचार होत आहेत. राहुल गांधी यांनी शीख धर्मियांच्यातील मनाच्या भावना बोलू दाखवल्या. असे म्हणत पन्नू यांनी आपली खलिस्तानवादी भूमिका पुनश्च अधोरेखित केली. भारतात शीख धर्मीयच काय पण कोणत्याही नागरिकावर धार्मिक आचार-विचाराची बंधने नाहीत, हे सांगण्यासाठी कोणा दिव्यदृष्टी असलेल्या राष्ट्रपुरुषाची गरज नाही. भारतात धर्माच्या आधारावर सर्वसामान्य नागरिकांवर बंधने असती तर सीएए कायद्याला विरोध करण्यासाठी दिल्लीतील शाहीनबागमध्ये आंदोलकांना २-३ महिने रस्ता रोखता आला नसता. याच आंदोलकांनी पोलिसांवर कसा गोळीबार केला हे दिल्लीकरांनी पाहिले आहे. ३ वर्षापूर्वी शेतकरी आंदोलकांनी दिल्लीत लाल किल्ल्यावर चढाई करून खलिस्तानचा झेंडा कसा फडकवला, हेही दिल्लीकरांनी पाहिले आहे. राहुल गांधींच्या खोटेपणाला पन्नूसारख्या खलिस्तानवाद्याने साथ देणे अपेक्षितच होते. काँग्रेसच्या इतिहासात डोकावून पाहिले तर देशविरोधी शक्तींना मिळालेल्या पाठिंब्याची अनेक उदाहरणे सापडतील. १९८४ मध्ये भोपाळ येथे युनियन कार्बाईड या बहुराष्ट्रीय कंपनीत झालेल्या गॅस गळतीमुळे हजारो निरपराध नागरिकांना प्राण गमवावे लागले. शेकडो नागरिकांना आजन्म अंधत्व आले. या गॅस गळतीला जबाबदार असणाऱ्या कंपनीचे प्रमुख वॉरन ॲण्डर्सन यांच्याबद्दल तेथील जनतेत संतापाची लाट उसळली. काहीजणांनी त्यांच्या विरुद्ध पोलिसांकडे तक्रारही नोंदविली. ॲण्डर्सन यांना अटक करण्यासाठी मध्य प्रदेश पोलिसांचे पथक गेले होते. मात्र त्यावेळी पंतप्रधान असलेल्या राजीव गांधी यांनी या ॲण्डर्सन महाशयांना तातडीने अमेरिकेत पाठविण्याचे आदेश तत्कालीन मुख्यमंत्री अर्जुन सिंह यांना दिले होते. वरून आदेश येताच ॲण्डर्सन यांना लाल दिव्याच्या गाडीतून विमानतळावर नेण्यात आले. तेथून सरकारी विमानाने त्यांना दिल्लीला पाठविण्यात आले. गॅस गळतीत प्राण गमावाव्या लागलेल्या हजारो भारतीय नागरिकांच्या कुटुंबियांच्या दु:खाची पर्वा न करता केंद्रात आणि राज्यात सत्तेत असलेल्या काँग्रेसच्या डबल इंजिन सरकारने ॲण्डर्सनला सुखरूप मायदेशी पोहचविले. हा देशद्रोहाचा सर्वोत्तम नमुना होता. राजीव गांधी पंतप्रधान असतानाच बोफोर्स या स्वीडिश बनावटीच्या तोफांचा खरेदी व्यवहार भ्रष्टाचाराच्या आरोपामुळे जगभर गाजला. अनेक वर्षाच्या चौकशीनंतर बोफोर्स तोफा खरेदी गैरव्यवहारात इटलीचा नागरीक क्वात्रोची याच्याविरुद्ध केंद्रीय गुप्तचर विभागाने आरोपपत्र दाखल केले. मनमोहन सिंह सरकार सत्तेत असताना इंटरपोलकडून क्वात्रोची याला अर्जेटिनामध्ये अटक करण्यात आली. सीबीआयला ही माहिती तातडीने कळविली गेली. मात्र मनमोहन सिंह सरकारने क्वात्रोचीच्या प्रत्यार्पणासाठी आवश्यक ती कारवाई करण्यात जाणून-बुजून दिरंगाई केली. परिणामी हा क्वात्रोची भारताच्या ताब्यात कधीच येऊ शकला नाही. हा पन्नू ज्या खलिस्तानची भाषा करतो त्याच मागणीसाठी भारताविरुद्ध जवळपास युद्ध पुकारणारा जनरेल सिंह भिंद्रनवाले याला राहुल गांधींच्या आजीने आणि काकाने म्हणजे इंदिरा आणि संजय गांधी यांनी कसे खत पाणी घातले, याचे हजारो पुरावे उपलब्ध आहेत. इंदिरा गांधींच्या हत्येनंतर दिल्लीत शेकडो शीख नागरिकांची निर्घृण कत्तल करण्यात आली. ही कत्तल करण्यात एच.के.एल. भगत, जगदीश टायलर, सज्जन कुमार, कमलनाथ या काँग्रेस नेत्यांचा हात होता हे न्यायालयात सिद्ध झाले. या कत्तलीचे तेव्हाचे पंतप्रधान आणि राहुल गांधींचे पिताश्री राजीव गांधी यांनी निर्लज्ज समर्थनही केले होते. शीख धर्मियांना भारतात स्वातंत्र्य नाही, असे म्हणताना राहुल गांधींना हा इतिहास कदापि आठवणार नाही. पन्नूने राहुल गांधींच्या सुरात सूर मिसळावा याचे मुळीच आश्चर्य वाटत नाही, याचे कारण काँग्रेसचा इतिहासच देश विघातक शक्तींशी असलेल्या संशयास्पद संबंधामुळे डागाळला आहे. ■

# लखपती दीदी बदलत आहेत संपूर्ण कुटुंबांचे भाग्य



केंद्र सरकार देशातील माता-भगिनींना सक्षम बनवण्यासाठी आणि त्यांचे जीवन सुखकर करण्यासाठी पूर्णपणे वचनबद्ध आहे. आपली हीच वचनबद्धता कायम राखत सरकारने तीन कोटी महिलांना लखपती बनवण्याचे उद्दिष्ट ठेवळे आहे. या योजनेंतर्गत आतापर्यंत एक कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्यात आले आहे. ही योजना देशभरातील महिलांना सक्षम बनवण्याचे एक मोठे माध्यम बनत आहे. २५ ऑगस्ट रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी महाराष्ट्रातील जळगाव येथे लखपती दीदी संमेलनात सहभागी झाले आणि त्यांच्याशी संवाद साधला...

**लखपती** दीदी बनवण्याचे अभियान केवळ बहिणी आणि मुलींची कमाई वाढवण्याचे अभियान नाही, तर संपूर्ण कुटुंबाला, भावी पिढ्यांना सक्षम बनवण्याचे एक महाअभियान आहे. हे अभियान गावाचे संपूर्ण अर्थतंत्र बदलत आहे. प्रत्येक बहीण आणि मुलगी यांना चांगले माहित आहे की जेव्हा त्या कमावू लागतात तेव्हा कसा त्यांचा अधिकार वाढतो. घरात-कुटुंबात त्यांचा आदर वाढतो. जेव्हा एखाद्या बहिणीचे उत्पन्न वाढते तेव्हा त्या कुटुंबाकडे खर्च करण्यासाठी अधिक पैसे देखील जमा होतात. म्हणजेच एका बहिणीचे लखपती दीदी बनणे, संपूर्ण कुटुंबाचे नशीब पालटत आहे. मी देशाच्या कानाकोपऱ्यातून आलेल्या अशा बहिणींचे अनुभव ऐकत होतो ज्यात आत्मविश्वास होता. मी त्यांना लखपती दीदी म्हणतो खरं, पण त्यांच्यापैकी काही दोन लाख कमावणाऱ्या, काही तीन लाख कमावणाऱ्या, काही आठ लाख कमावणाऱ्या देखील होत्या. आणि ही कामगिरी त्यांनी गेल्या काही महिन्यांमध्ये करून दाखवली आहे.

# पंतप्रधान मोदी यांनी ११ लाख नवीन लखपती दीदींना प्रमाणपत्रे प्रदान केली



पंतप्रधान नरेंद मोदी यांनी महाराष्ट्रातील जळगावमध्ये त्या ११ लाख नवीन लखपती दीदींना प्रमाणपत्रे प्रदान केली आणि त्यांचा गौरव केला, ज्या अलिकडेच रालोआ सरकारच्या तिसऱ्या कार्यकाळात लखपती बनल्या आहेत. त्यांनी २५०० कोटी रुपयांचा एक फिरता निधी जारी केला, ज्याचा ४.३ लाख बचत गटांच्या सुमारे ४८ लाख सदस्यांना लाभ होईल. त्यांनी ५,००० कोटी रुपयांचे बँक कर्ज देखील वितरित केले, ज्याचा २.३५ लाख बचत ठटांच्या २५.८ लाख सदस्यांना लाभ होईल. लखपती दीदी योजना सुरू झाल्यापासून आतापर्यंत एक कोटी महिलांना लखपती दीदी बनवण्यात आले आहे. सरकारने ३ कोटी लखपती दीदी तयार करण्याचे उद्दिष्ट ठेवले आहे.

भारताच्या 'मातृशक्तीने' नेहमीच समाजाचे आणि राष्ट्राचे भविष्य घडवण्यात खूप मोठे योगदान दिले आहे. आज जेव्हा भारत विकसित बनण्याचा प्रयत्न करत आहे, तेव्हा आपली नारीशक्ती पुन्हा एकदा पुढे येत आहे. मी महिलांवरील भार कमी करण्याचा संकल्प केला आणि एकामागोमाग एक महिलांच्या हिताचे निर्णय घेतले. सध्याच्या सरकारच्या १० वर्षांची त्याआधीच्या सात दशकांशी तुलना करत सध्याच्या सरकारने महिलांच्या हितासाठी अधिक काम केले आहे. आज संपूर्ण भारतामधील लाखो महिला बचतगटांसाठी ६,००० कोटींहून अधिक रक्कम वितरित करण्यात आली. ही रक्कम अनेक महिलांना लखपती दीदी' बनण्यासाठी प्रेरित करेल.

जुलै महिन्यात देशाचा अर्थसंकल्प सादर करण्यात आला. यामध्ये माता, भगिनी आणि मुलींशी संबंधित योजनांसाठी ३ लाख कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मुलींनी जास्तीत जास्त संख्येने नोकरी करावी यासाठी कार्यालयात, कारखान्यात त्यांच्यासाठी विशेष सुविधांची निर्मिती करण्याची घोषणा करण्यात आली आहे. त्यांना राहण्यासाठी वर्किंग वुमन हॉस्टेल, मुलांसाठी पाळणाघराची सुविधा पुरवण्यावर केंद्र सरकार

> माता-भगिनींचे जीवन सुखकर बनवण्यासाठी आमचे सरकार पूर्णपणे वचनबद्ध आहे. महाराष्ट्रामधील जळगाव लखपती दीदींचा उत्साह आणि विश्वास अद्‌भूत आहे. देशभरातील लखपती दीदींना माझा नमस्कार
>
> - नरेंद्र मोदी, पंतप्रधान

काम करत आहे. आमचे सरकार मुलींसाठी प्रत्येक क्षेत्र खुले करत आहे जिथे कधीकाळी त्यांच्यावर अनेक निर्बंध होते. माता, भगिनी आणि मुलींचे सामर्थ्य वाढवण्यासोबतच त्यांची सुरक्षा वाढवणे ही देखील देशाची प्राथमिकता आहे. हा मुद्द मी लाल किल्ल्यावरून बोलताना देखील अनेक वेळा मांडला आहे असे पंतप्रधान मोदी म्हणाले. आज देशातील कोणतेही राज्य असो, आपल्या भगिनी आणि मुलींची वेदना, त्यांचा राग मला समजतो आहे. मी पुन्हा एकदा देशातील प्रत्येक राजकीय पक्षाला सांगू इच्छितो, प्रत्येक राज्य सरकारला सांगू इच्छितो की महिलांविरोधात घडणारे गुन्हे हे अक्षम्य पाप आहे. दोषी कोणीही असो, त्याची सुटका होता कामा नये. ■

# 'एनपीएस वात्सल्य' योजनेचा अर्थमंत्री निर्मला सितारामन यांच्या हस्ते प्रारंभ




**केंद्रीय** अर्थमंत्री निर्मला सितारामन यांच्या हस्ते केंद्र सरकारच्या 'एनपीएस वात्सल्य' योजनेचा शुभारंभ करण्यात आला. दिल्ली येथील या कार्यक्रमाचे थेट प्रक्षेपण दूरदृश्य प्रणालीच्या माध्यमातून पुणे येथे करण्यात आले. केंद्र सरकारच्या अर्थ मंत्रालयाने यंदाच्या अर्थसंकल्पात एनपीएस वात्सल्य ही अतिशय महत्त्वपूर्ण योजना जाहीर केली होती. वात्सल्य याचा अर्थच मूळात माया आणि ममता असून त्याचे प्रतिबिंब या योजनेत दिसून येते. पूर्वीच्या काळी केवळ पेन्शन या कारणासाठी शासकीय नोकरीस प्राधान्य दिले जायचे. नंतरच्या काळात एनपीएसच्या स्वरुपात पेन्शनची संधी खासगी नोकरदारांनाही उपलब्ध करून देण्यात आली. आता अल्पवयीन मुलांसाठी एनपीएस वात्सल्य योजनेच्या माध्यमातून ही संधी प्राप्त झाली असून या योजनेमुळे मुलांचे भविष्य सुरक्षित होईल, याचा विश्वास वाटतो. एनपीएस वात्सल्य ही ० ते १८ वयोगटातील बालकांसाठी नवीन पेन्शन योजना आहे. पालक आपल्या मुलांच्या नावे या पेन्शन योजनेत महिन्याला किमान १ हजार तर वर्षभरात कमाल अमर्यादीत रुपये जमा करू शकतो. मुलाच्या १८ वर्षापर्यंत हे खाते पालक चालवतील त्यानंतर मुलांच्या नावे हे खाते होणार आहे.

मुलगा १८ वर्षाचा झाला की, हे खाते अखंडपणे नियमित एनपीएस खात्यात किंवा एनपीएस नसलेल्या योजनेत रुपांतरीत केले जाऊ शकते. थोडक्यात बालकाच्या भविष्यासाठी राष्ट्रीय पेन्शन योजनेचे खाते शून्य ते १८ या वयोगटात उघडण्याची ही योजना असून त्यांचे भविष्य सुरक्षित करण्याच्या दृष्टीने ही योजना अत्यंत महत्त्वपूर्ण आहे. एनपीएस वात्सल्य ही ० ते १८ वयोगटातील बालकांसाठी नवीन पेन्शन योजना आहे. पालक आपल्या मुलांच्या नावे या पेन्शन योजनेत महिन्याला किमान १ हजार तर वर्षभरात कमाल अमर्यादीत रुपये जमा करू शकतो. मुलाच्या १८ वर्षापर्यंत हे खाते पालक चालवतील त्यानंतर मुलांच्या नावे हे खाते होणार आहे. मुलगा १८ वर्षाचा झाला की, हे खाते अखंडपणे नियमित एनपीएस खात्यात किंवा एनपीएस नसलेल्या योजनेत रुपांतरीत केले जाऊ शकते. थोडक्यात बालकाच्या भविष्यासाठी राष्ट्रीय पेन्शन योजनेचे खाते शून्य ते १८ या वयोगटात उघडण्याची ही योजना आहे. मुलांसाठी दीर्घकालनी बचत आणि आर्थिक नियोजनाला यामुळे हातभार लागणार आहे. भारतीय नागरीक असणे ही या योजनेची प्राथमिक अट असून नागरिकांच्या सेवानिवृत्तीच्या गरजा पूर्ण करण्यासाठी यातून आर्थिक सुरक्षा निर्माण केली जाते. ■

# कापूस-सोयाबीन अनुदान योजनेतून ४९ लाख शेतक-यांच्या खात्यात २३९८ कोटी रु. जमा



**गतवर्षी** पिकांना मिळालेल्या कमी दरामुळे नुकसान झालेल्या सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना हेक्टरी पाच हजार रुपये प्रमाणे अर्थसहाय्य करण्याबाबत कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी कार्यवाही केली होती. अर्थसहाय्य योजनेतून मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार तसेच कृषीमंत्री मुंडे यांच्या हस्ते ऑनलाईन वितरण प्रणालीची कळ दाबून प्रत्यक्ष शेतकऱ्यांना अर्थसहाय्य वितरणाची सुरुवात मंत्रिमंडळ बैठकीतून करण्यात आली. याद्वारे एका क्लिकवर सुमारे ४९ लाख ५०हजार शेतकऱ्यांच्या खात्यावर हेक्टरी ५ हजार रुपये प्रमाणे दोन हेक्टरच्या मर्यादेत २३९८ कोटी ९३ लाख रुपये रक्कम वर्ग करण्यात आले. २०२३ च्या खरीप हंगामात एकूण ९६ लाख ७८७ सोयाबीन व कापूस उत्पादक शेतकऱ्यांना कृषी विभागाने एकूण ४१९४ कोटी रुपये इतका निधी डीबीटी प्रणालीवर उपलब्ध करून दिलेला आहे. त्यापैकी १५४८ कोटी ३४ लाख रुपये कापूस तर सोयाबीनसाठी २६४६ कोटी ३४ लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

अनुदान स्वतंत्ररित्या वितरण करण्यासाठी लेखाशीर्षासह महाआयटीद्वारे स्वतंत्र पोर्टल तयार करण्यात आले होते. पारदर्शक पद्धतीने कार्यवाही करण्यासाठी शेतकऱ्यांचे संमती पत्र व बँक खाते आधार इत्यादी माहिती जमा करण्यात आली. जवळपास ४९ लाख ५० हजार शेतकऱ्यांना आपण याद्वारे लाभ दिला आहे. आधार व अन्य माहितीची जसजशी जुळणी होत राहील तसं तसे उर्वरित शेतकऱ्यांनादेखील या योजनेचा लाभ दिला जाईल, अशी माहिती कृषीमंत्री धनंजय मुंडे यांनी दिली आहे. ■

# भारतातील पहिला सेमीकंडक्टर प्रकल्प महाराष्ट्रात सुरु!




महाराष्ट्रातील पहिल्या सेमीकंडक्टर उत्पादन OST प्रकल्पाचे उद्घाटन महापे, नवी मुंबई येथे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजितदादा पवार, भारतरत्न सचिन तेंडुलकर, ज्येष्ठ अणुशास्त्रज्ञ पद्मविभूषण डॉ. अनिल काकोडकर यांच्या उपस्थितीत झाले. हा दिवस हा देशाच्या आणि महाराष्ट्राच्या इतिहासात सुवर्णाक्षरात लिहिला जाईल. भारतातील सेमीकंडक्टर क्षेत्रातील पहिला प्रकल्प महाराष्ट्रात सुरु होत असल्याचा विशेष आनंद आहे. अभिमानाची गोष्ट म्हणजे एका मराठी माणसाने ही इकोसिस्टीम सर्वात पहिल्यांदा उभी केली असून याची क्लिनरूम तयार करणारा एक नागपूरकर आहे.

OST आणि TMP मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्रातील हा टप्पा गाठणारा पहिला प्रकल्प म्हणून 'आरआरपी इलेक्ट्रॉनिक' कडे पाहिले जात आहे. आयटी व डिझाईन क्षेत्रात जसे भारतीय पुढे आहेत, अगदी त्याचप्रमाणे रिअल हार्डवेअर क्षेत्रात पुढे जाण्यासाठी आणि जगामध्ये विकसित राष्ट्र म्हणून प्रस्थापित होण्यासाठी भारताला सेमीकंडक्टर क्षेत्रात प्रस्थापित करणे गरजेचे होते. यासंदर्भात पंतप्रधान नरेंद्र मोदीजी यांनी एक मिशन हाती घेतले. या मिशनला सपोर्ट करणारी एक इकोसिस्टीम उभी करण्याचा प्रयत्न त्यांनी केला. सेमीकंडक्टर क्षेत्रात आपली स्वतःची पॉलिसी, इन्सेन्टिव्ह पॅकेज आणि सपोर्टींग इकोसिस्टीम तयार करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य ठरले आहे.

आर्टिफिशियल इंटेलिजन्सने जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये आपली क्षमता विस्तारली आहे. त्यामुळे डिजिटल वर्ल्ड आणि आर्टिफिशियल इंटेलिजन्स एक प्रकारे आपले जीवन बदलत आहेत. यामुळे भविष्यातील रोजगाराच्या संधी, पायाभूत सुविधा आणि सामाजिक क्षेत्रातील प्रत्येक गोष्टीत क्रांती घडविण्यासाठी 'सेमीकंडक्टर' अतिशय महत्त्वाचे आहेत. आरआरपी तयार करत असलेली रिप्लेसमेंट टेक्नोलॉजी जगातील इतर देश देखील वापरतील, असा मला विश्वास आहे. गेल्या महिन्यात महायुती सरकारने सेमीकंडक्टर क्षेत्रात १० बिलियन डॉलर्सची गुंतवणूक आणली आहे. याशिवाय 'होरिबा' कंपनीदेखील नागपुरात सेमीकंडक्टरमध्ये लवकरच गुंतवणूक करणार आहे. भारताला विकसित राष्ट्र बनविण्यासह महाराष्ट्राला ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनविण्यासाठी सेमीकंडक्टर इकोसिस्टीम अत्यंत महत्त्वाची आहे. पुढील १० वर्षात जेव्हा सेमीकंडक्टर इंडस्ट्रीचा इतिहास वाचला जाईल, त्यावेळी अनिल काकोडकरजी, राजेंद्र चोडनकर आणि सचिन तेंडुलकर यांचे नाव निश्चितपणे घेतले जाईल. २०२६ मध्ये देशातील पहिली चीप ज्यावेळी प्रत्यक्ष बाजारात येईल, त्यावेळीही आम्हालाच बोलवाल असा विश्वासही उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. ■

पाक्षिक मनोगत प्रदेश बीजेपी

# अंबरनाथ, बदलापूर, नेरळवरुन नरिमन-पॉईंट, फोर्ट 40 मिनिटात!!

## पनवेल, तळोजा, कल्याण, भिवंडी येथील वाहतूककोंडी संपणार



**वेगाने** पूर्णत्वाकडे वाटचाल करणाऱ्या बडोदा-जेएनपीटी महामार्गावरील महत्त्वाचा भाग असलेला माथेरान येथील बदलापूर ते पनवेल असा सव्वा चार किलोमीटर अंतराचा बोगदा हा राज्यातील सर्वात लांब भुयारी मार्ग ठरणार आहे. हा बोगदा अवघ्या १५ महिन्यांत पूर्ण करण्यात आला आहे!

या बोगद्यामुळे बदलापूर ते पनवेल हा प्रवास अवघ्या १० मिनिटांमध्ये (आय रिपीट, १० मिनिटांमध्ये!) करणे शक्य होईल! बदलापूर-पनवेल थेट जोडले गेल्याने अटल सेतूमार्गे अंबरनाथ, बदलापूरकरांना ४० मिनिटांत मुंबई गाठणे शक्य होईल.

या महामार्गावर बदलापूर ते पनवेल प्रवासासाठी दोन बोगदे उभारण्यात आले आहेत. यापैकी एक बोगदा १००% पूर्ण झाला असून दुसऱ्या बोगद्याच्या आतील भागात प्लॅस्टरिंगचे काम सुरु आहे. हे कामही ऑक्टोबरच्या अखेरपर्यंत पूर्ण होईल.

महाराष्ट्रात पालघर जिल्ह्यातील तलासरी ते रायगड जिल्ह्यात पनवेल तालुक्यातील करंजाडे गावापर्यंत हा महामार्ग असेल. या महामार्गावर कल्याण, बदलापूर व इतर ठिकाणी जाण्यासाठी इंटरचेंज असतील.

मुंबई, मुंबई-अहमदाबाद महामार्ग, वाढवण बंदर, जेएनपीटी बंदर, समृद्धी महामार्ग, मुंबई-बेंगळुरू, मुंबई-एरनाकुलम (गोवा हायवे) ही सर्व ठिकाणे आता बदलापूर, अंबरनाथ, नेरळ येथील लोकांसाठी १० मिनिट ते ४५ मिनिटांवर येत आहेत, तर नवी मुंबई येथील मुंबईचा ढ-३ एयरपोर्ट फक्त २५ मिनिटांवर येत आहे. डबल-इंजिन सरकारचे धन्यवाद आणि यातून ज्या लाखो लाभार्थ्यांचे कल्याण होणार आहे त्यांचे अभिनंदन! **- वेद कुमार**




**कर्जत–जामखेड येथील शरद पवार गटाचे मधुकर राळेभात, उबाठाचे संजय काशीद यांचा भाजपा प्रवेश– उपस्थिती–** उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, महसूल मंत्री राधाकृष्ण विखे–पाटील, आ. राम शिंदे, आ. सुरेश धस, आ. अतुल भातखळकर आदी.




**मुरबाड– पक्ष प्रवेश– उपस्थिती–** आ. किसन कथोरे, टेमगांव येथील धिरज शेलवले, योगेश शेलवले, कैलास टोहाके, कैलास शेलवले, मनोज शेलवले, हर्षल लाडे, जगदीश शेलवले, भूषण शेलवले, समीर शिरोशे, विनीत शेलवले आदी.



**मुरबाड– आदिवासी बांधव कार्यकर्त्यांचा भारतीय जनता पक्षात प्रवेश– उपस्थिती–** आ.किसन कथोरे, अनिल घरत, गोविंद भला, रमेश उघडा, अनिल कवटे, लाड्या मेंगाल, गणेश पारधी, वैभव सरोगदे आदी.




**कामठी (जि.नागपूर)– महिला मेळावा– उपस्थिती–** प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे, आ. टेकचंद सावरकर, कामठी विधानसभा प्रभारी अल्पेश आर्या, अनिल निधान, अजय बोढारे, अजय अग्रवाल, राधा अग्रवाल, मनीष वाजपेयी, निशा सावरकर, राजेश रंगारी, वैशाली चोपडे, अनुराधा आमीन, कुंदाताई रोकडे, चंद्रशेखर तुपट, संजय कनोजिया, लाला खंडेलवाल, कपिल गायधने, पंकज वर्मा, मुकेश अग्रवाल, विजय कोंडूलवार आदी.



**पिंपळनेर (जि. धुळे)– रक्तदान शिबिर– उपस्थिती–** जिल्हा उपाध्यक्ष प्रदीप कोठावदे, प्रसिद्धी प्रमुख मोतीलाल पोतदार, युवा मोर्चा मंडल अध्यक्ष पंकज भावसार, जिल्हा चिटणीस प्रमोद गागुर्डे, शहराध्यक्ष डॉ.राजेंद्र पगारे, विकी कोकणी, नितिन कोतकर, प्रतिक कोतकर, कल्फेश नेरकर, दिपक गांगुर्डे, प्रकाश अहिरराव, चंद्रशेखर बाविस्कर, नंदनसाहेब, गजानन कोतकर, पंकज चोरडिया, योगेश वाघ, शाम पगारे, दिलीप चौधरी, रविंद्र कोतकर आदी.



**परतूर (जि. जालना)– स्वच्छता कर्मचाऱ्यांना टी–शर्टचे वाटप– उपस्थिती–** प्रदेश समन्वयक भाजपा वैद्यकीय आघाडी डॉ. स्वप्नील मंत्री, डॉ. सुधीर आंबेकर, डॉ. हरिप्रसाद ढेरे, अजित पोरवाल, सुमित मोर, सखाराम कुलकर्णी, संतोष पवार, अर्जुन भांडवलकर, हरिओम निंबाळकर, श्याम लोमटे, श्रीराम बगडीया, अशोक काळे आदी.



**आजरा (जि.कोल्हापूर)– रक्तदान शिबिर– उपस्थिती–** जिल्हाध्यक्ष नाथाजी पाटील, तालुकाध्यक्ष अनिरुद्ध केसरकर, अशोक चराटी, जनार्दन टोपले, सी आर देसाई, अतिशकुमार देसाई, लहू वाकर, दशरथ अमृते, जयवंत सुतार, अनिल पाटील, अनिल नार्वेकर, संभाजी सरदेसाई, विकास बागडी, संतोष चौगुले, भास्कर भाईंगडे, संदीप पाटील, महेश पारपोलकर, अभिजीत रांगणेकर, संग्राम पाटील, समीर देसाई आदी.



**चिपळूण (जि.रत्नागिरी)– रक्तदान शिबिर– उपस्थिती–** महिला मोर्चा प्रदेश उपाध्यक्षा चित्रा चव्हाण, माजी नगरसेवक विजय चितळे, मंडल अध्यक्ष श्रीराम शिंदे, उपाध्यक्ष जतिन घटे, भरत परब, निकिला रतावा, राकेश घोरपडे, शहर सरचिटणीस सारिका भावे, विनायक वरवडेकर, चिटणीस प्रणाली सावर्डेकर, कोषाध्यक्ष रोहित हटकर, युवा मोर्चा शहराध्यक्ष संदीप भिसे आदी.

# प्रदेशाध्यक्षांचा संवाद बैठक कार्यक्रम



**चिखली (जि.बुलढाणा)- संवाद बैठक- उपस्थिती-** जिल्हाध्यक्ष डॉ. गणेश मांटे, आ. श्वेता महाले-पाटील विधानसभा संयोजक योगेश राजपूत, विजूभाऊ कोठारी, सुरेश कबुतरे, पंडित देशमुख, सुनील पोकळे, अनीस भाई, रामदास देवळे, संजय चेके पाटील, सुरेंद्र पांडे, प्रेमराज भाला, आशाताई घाडगे, सागर पुरोहित आदी.




**पुलगाव (जि. वर्धा)- संवाद बैठक- उपस्थिती-** जिल्हाध्यक्ष सुनील गफाट, माजी खा.रामदास तडस, प्रदेश सचिव सरिता गाकरे, सुधीर दिवे, राजेश बकाने आदी.




**बाळापूर (जि.अकोला)- संवाद बैठक- उपस्थिती-** प्रदेश सरचिटणीस आ. रणधार सावरकर, खा. अनुप धोत्रे, किशोर मांगटे-पाटील, जयंत मसने, बळीराम शिरसकर, रमन जैन, श्यामराव शेलार, गजानन खरवडे, प्रेमानंद श्रीरामे, गणेश तायडे आदी.




**लाड-कारंजा (जि.वाशीम)- संवाद बैठक- उपस्थिती-**जिल्हाध्यक्ष श्याम बढे, माजी आ. विजय जाधव, द्यायक पाटणी, राजू पाटील आदी.

RNI NO. MAHMAR/2018/76180
Posting Under the Registration No.MCS/221/2024-26, License To Post Without Prepayment,
WPP Licence No.: MR/Tech/WPP-351/South/2024-26, Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, Mumbai-400001.
Published on 1st and 16th of every month and Posted on 8th, 9th, 10th and 23rd, 24th, 25th of every month.

https://www.facebook.com/bjpmanogat @manogatbjp




**प्रति,**

______________________

______________________

______________________

______________________

**प्रेषक,**
**कार्यालय मंत्री :**
भारतीय जनता पार्टी,
महाराष्ट्र प्रदेश कार्यालय,
वसंतराव भागवत चौक, नरिमन पॉईंट, मुंबई-२०
दूरध्वनी : ०२२-२२०२२०५०, फॅक्स : ०२२-२२८५२३०५
ई मेल- bjpmaha.manogat@gmail.com